नित्यनेमावलीतील

कन्नड भजनांचा मराठी भावानुवाद

अनुवादिका
पद्मा कुलकर्णी

२००७

नित्यनेमावलीतील

कन्नड भजनांचा मराठी भावानुवाद

अनुवादिका
पद्मा कुलकर्णी

२००७

पहिली आवृत्ती : २००७

© प्रकाशिका

प्रकाशिका :
सौ. अश्विनी जोग व सौ. अंजली कन्नूर
टी. एफ. १, मंदार अपार्टमेंटस्
१०१ रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१
फोन नं - ०२१७/२३१८२४४

मूल्य : १० = ०० रुपये

मुद्रक :
संप्रति ऑफसेट प्रिंटर्स
६२-अ मंगळवार पेठ, बुधले गल्ली,
सोलापूर - ४१३ ००२

तोंडओळख

ऐलमा पैलमा गणेशदेवा ।
माझा खेळ मांडून दे करीन तुझी सेवा ।

महर्षी व्यासांनी महाभारत रचण्याचा खेळ मांडला होता. पूर्ण कथानक अन्तर्मनात जय्यत तयार होतं. शब्द हात जोडून पुढे उभे होते. ते उतरवून घेण्यासाठी त्यांना लेखकु हवा होता. ब्रह्मदेवाच्या सल्ल्यानुसार ते साक्षात गणेशदेवांकडे गेले. ''ज्ञानमूर्ते, मी महाभारत तोंडाने सांगत जाईन, आपण मांडून द्यावे अशी नम्र विनंती आहे.'' गणरायांनी अनुमती दिली, पण एका अटीवर. ''तुम्ही बोलत जाल तसे मी टिपून घेईन. पण एकदा काम चालू झाले की माझी लेखणी लिहीलिहीतच राहील. ती थांबता कामा नये. तस्मात् तुमच्या कथाकथनाचा ओघ अखंड चालला पाहिजे.'' महर्षीही काही कमी नव्हते. त्यांनी प्रतिअट दाखल केली. ''मी आपली लेखणी खोळंबू देणार नाही. परंतु आपण मात्र सांगितलेल्या मजकुराचा पूर्ण अर्थ जाणून घेऊनच लिहीत गेले पाहिजे.'' चौदा विद्यांच्या त्या राजाला हसू आले. व्यासांच्या मुखातून येणाऱ्या काव्याचे स्फुरण आधी गजाननाच्या मनातच होणार नव्हते काय ? काही असो. उभयपक्षी करार झाला. देखणे शब्द श्लोकांत गुंफणे सुरू झाले. लेखणीतून मोत्यांसारख्या अक्षरांच्या ओळीच्या ओळी निघू लागल्या. सांगता सांगता व्यास मध्ये मध्ये अवघड शब्दरचना करीत, अर्थघन वाक्ये उच्चारीत. त्यांचे आकलन करून घेण्यासाठी विद्याधिपती मंगळमूर्ती काही वेळ घेत (म्हणजे व्यासांच्या सोयीसाठी तसे दाखवीत !). तेवढ्या अवधीत महर्षी पुढचे श्लोक मनात जुळवून ठेवीत. अशा अलौकिक रीतीने आपल्याला महाभारत या इतिहासरत्नाची प्राप्ती झाली आहे.

उद्या व्यासमहर्षी पृथ्वितलावर उतरून आले आणि, 'पुरा अर्थ जाणून घेऊनच भजन म्हटले पाहिजे,' अशी त्यांनी आज्ञा केली तर आपली गत काय होईल ? कन्नड भाषेचा गंध नसणारे साधक 'बेळगायितु बेळगायितु' असे तोंडाने म्हणताना अर्थाच्या दृष्टीने अंधारातच राहतील. एक दोन भूपाळ्या होतात न होतात तोपर्यंत मराठी न जाणणाऱ्या साधकांची स्थिती तशीच होईल. भजनाचा काही भाग आपण पोपटासारखा म्हणतो ही गोष्ट मनात कित्येक वर्षे डाचत आहे आणि आपण त्यासाठी काही करत नाही याची खंतही आहे. कन्नड भजनांचेच कशाला? मराठी मातृभाषा असूनही सगळ्याच्या सगळ्या मराठी भजनांचा अर्थ आपल्याला

समग्र कळला आहे, असे छातीठोकपणे सांगणारे कितीजण भेटतील ? दुपारच्या भजनातील 'निरंजनीं वनीं देखिली मी गाय,' याचा अर्थ गेली ३५ वर्षे अनेक विद्वानांना विचारूनही नीट कळलेला नाही. अशा गोष्टी सध्या बाजूला ठेवू. आता फार खोल पाण्यात शिरायचे नाही. मराठी मातृभाषा असणाऱ्यांना मराठी भजनांचा अर्थ समजतो असे धरून चालू. कन्नड भाग मात्र अगम्य राहतो. 'फोडुनि शब्दाचे अंतर, वस्तु दाखवी निजसार' असे समर्थांचे सांगणे आहे (दासबोध ५.२.१५). शब्दाचे सार ध्यानात आले पाहिजे. आपण काय म्हणतो आहोत हे समजणे जरूर आहे. भजनात भावाला अग्रक्रम आहे हे कबूल, पण अर्थ उलगडला म्हणजे भावयुक्त नामघोष दुधात साखर घातल्याप्रमाणे खुलतो. धन्य ते गायनी कळा असेही समर्थांनीच सांगितले आहे. कानाला गोड लागणाऱ्या चालींची जोड भजनांना असतेच. पण तिथेही जपूनच पाऊल टाकायला हवे नाहीतर आपली स्थिती अर्जुनासारखी होईल.

तेवीं देवर्षि अध्यात्म गाता । आहाच रागांगेंसीं जे मधुरता ।
तेचि फावे येर चित्ता । नलगेचि कांहीं ।। (ज्ञानेश्वरी १०.१५७)

अर्जुन म्हणतो, 'देवा, नारद वीणेवर गाताना अध्यात्मज्ञान सांगत होते पण आमचे चित्त त्यांनी आळवलेल्या स्वरांकडेच होते. परिणामी हाती काहीच लागले नाही'.

भजनातल्या प्रत्येक शब्दाचा अर्थ न कळो बापडा, पण निदान स्थूलमानाने का होईना पदाचा गाभा हातात आला पाहिजे. काही वर्षांपूर्वी जोधपूरचे डॉ. रघुनाथ विनायक दाते यांनी एक उपक्रम हाती घेतला होता. नित्यनेमावलीचे हिंदी भाषांतर त्यांना करायचे होते. म्हणून कन्नड शब्दाला मराठी शब्द एवढीच त्यांची मागणी होती. नंतर साजरी गोजरी हिंदी वाक्यरचना ते करणार होते. अर्थ जाणून घेण्याचा त्यांचा उद्देश इतकाच होता. या गोष्टीचा फायदा असा झाला की त्यांना लिहून दिलेला कन्नड शब्दांचा मराठी अर्थ आज प्रस्तुत पुस्तिकेसाठी उपयोगी पडला. इथे भजनांचे भाषांतर न करता स्वैर रूपांतर केले आहे. पदांचा आशय पकडण्याचा हा प्रयत्न आहे. गुरुदेव रा. द. रानडे यांना शब्दशः केलेले भाषांतर आवडत नसे, अर्थशः केलेले रूपांतर पसंत पडे. असे करताना मुळातला एखादा शब्द सुटून जाईल. उलट काही वेळेस संदर्भ कळावा म्हणून एका शब्दासाठी एक दोन वाक्येदेखील येतील. मूळ संहितेतून काय उचलायचे आहे इकडे लक्ष आहे. म्हणून फलाण्या शद्बाला हाच प्रतिशब्द (किंवा वाक्य) का वापरला अशी शब्दकोश-छाप मोजपट्टी इथे लावणे अनाठायी आहे. शब्दांना विविध रंगछटा असतात,

म्हणूनच प्राचीन सूत्रवाङ्मयावर भिन्नभिन्न, कधीकधी परस्परविरोधी भाष्ये झाली आहेत. प्रत्येकजण आपल्या निष्ठेनुरूप अंतःकरणाला स्पर्श करून गेलेला भावार्थ मांडत असतो. त्यांतला एक बरोबर व दुसरा चूक असा दुराग्रह ठेवता येत नाही. प्रस्तुत लिखाणाचा आदर्श ज्ञानेश्वरांची भावार्थदीपिका आहे, वामन पंडितांची यथार्थदीपिका नाही.

हे काम करताना मूळ शब्दाचा वाच्यार्थ घेतलेला नाही, तर निंबरगी संप्रदायाची पार्श्वभूमी पाहिली आहे. एकच उदाहरण पाहू. 'ज्योति बेळगुतदे' या पदातील 'ध्यानके निलुकदे' याचा वाच्यार्थ 'ध्यानाला वस्तू गवसत नाही' असा आहे. पण हा शब्दार्थ न घेता 'तर्काला न गवसणारे' असे त्याचे रूपांतर केले आहे. ध्यान किंवा नामस्मरण हा आपल्या संप्रदायाच्या शिकवणुकीचा प्राण आहे. ध्यानाला अगम्य असे काय आहे ? ध्यानाचे अनन्यसाधारण स्थान खालील उदाहरणावरून स्पष्ट होईल. ईश्वरप्रणिधानात् *वा* (योगसूत्र १.२३) या सूत्रातील '*वा*' हा शब्द गुरुदेवांना खटके. ध्यानाने *सुद्धा* अंतिम स्थिती गाठता येते असा सूत्राचा अर्थ आहे. इथे ध्यानाला दुय्यम स्थान दिले जाते आणि नेमके तेच गुरुदेवांना नको होते. ते म्हणत, 'ईश्वरप्रणिधानात् *एव* ' असे हवे होते. ध्यानाने*च* उत्तुंग पदवी गाठता येते. ध्यान मुख्य. नान्यः पन्थाः, हाच एक रस्ता, दुसरा रस्ता नकोच.

'ध्यानके' हा पाठ बरोबर आहे असे गृहीत धरून हे स्पष्टीकरण दिले. पण तो अपपाठ असल्याचे लक्षात आले आहे. ही आरती नित्यनेमावलीच्या पहिल्या चार आवृत्त्यांत नाही. १९४५ सालच्या पाचव्या आवृत्तीत ती प्रथम आली आणि तेव्हापासून आजतागायत 'ध्यानके' हा चुकीचा पाठच चालू आहे. १९०८ साली बाबाचार्य काव्य यांनी प्रसिद्ध केलेल्या 'महाराजरवर वचन' या निंबरगी संप्रदायाच्या शिकवणुकीच्या आद्य ग्रंथात पृ. २४२ वर हा पाठ 'ज्ञानके' असा आहे. तसेच कडकोळ मडिवाळेश्वर-विरचित स्वरवचनगळु या मडिवाळयोगींच्या पदसंग्रहात 'ज्ञानके' हाच पाठ आहे. (प्रकाशक, वीरशैव अध्ययन संस्थे, श्रीतोंटदार्य संस्थान मठ, गदग, १९८२, पृ. २५६). इथे ज्ञान म्हणजे शब्दज्ञान. शब्दज्ञानाला परमात्मा गवसत नाही हा साधा, सरळ, सोपा आणि अगदी योग्य अर्थ आहे. तोच ग्राह्य आहे. आता 'ध्यानके' हा शब्द बदलून तिथे 'ज्ञानके' हा पाठ घातला पाहिजे. नित्यनेमावलीच्या पुढच्या पुढच्या आवृत्त्यांतून शिरलेल्या इतर अपपाठांचा उल्लेख पुढे एक दोन ठिकाणी येईलच.

नित्यनेमावलीची पहिली आवृत्ती निघाल्याला १०० वर्षे होत आली.

बरीचशी भजने संतांच्या वचनांतून घेतलेली असली तरी ती मौखिक परंपरेतून आपल्यापर्यंत पोचली आहेत. अपपाठ शिरायला १०० वर्षांचा अवधी पुरेसा आहे! त्यातून अर्थ कळलेला नसणे हेही अपपाठ प्रचलित होण्याचे एक प्रमुख कारण आहे. प्रत्येक वेळेला मूळ संहिता मिळतेच असे नाही. म्हणून चुकीचे किंवा अशुद्ध पाठ कायम होतात. काही वेळेला वाक्यांचा अर्थ लागतच नाही, मग एकदम अनपेक्षितपणे वेगळा पाठ मिळतो व सुसंगती येते. सगळ्या कवींची नावेही माहीत नसतात. मुद्रिकाही उपयोगी पडत नाहीत. तिथे कधी स्वतःचे. कधी गुरूंचे, तर कधी ग्रामदेवतेचे नाव असते. म्हणून मूळ रचना शोधून काढता येत नाही. अर्थात, नेमावलीचा वाङ्मयीन अभ्यास करण्याचा आपला उद्देश नाही. कन्नड भजने समजावीत एवढी माफक इच्छा आहे. तरीही जिथे आवश्यक वाटली तिथे टिपणे दिली आहेत. त्यात थोडे स्पष्टीकरण असते. थोडा दडून राहिलेला इतिहासही असतो. नित्यनेमावलीत वेगवेगळ्या संप्रदायांतील पदे, भूपाळ्या, आरत्या किंवा पाळणे यांचा समावेश आहे. सहज पुस्तक चाळले तरी हे डोळ्यात भरते. श्रीभाऊसाहेब महाराज फार उदार वृत्तीचे होते. आपलाच संप्रदाय श्रेष्ठ अशी दुराग्रही धारणा त्यांच्या ठिकाणी अणुमात्र नव्हती. अनेक संप्रदायांतील रचना त्यांच्याकडे होत्या. नीती व परमार्थ यांची शिकवण याच कसोट्या असल्याने ही गोष्ट सहज साधली. महाराजांच्या लोकसंग्रहाचे हे रहस्य आहे. इतर संप्रदायांतील कवींची निदान तोंडओळख व्हावी म्हणून त्यांची चार-दोन वाक्यांत माहिती दिली आहे.

भजन नुसत्या भोळ्या भावाने न होता 'जाणतेनि' व्हावे असे वाटते. अर्थ कळला की पदकर्त्याच्या अंतरंगात शिरता येते, भाव वाढतो, उत्साह व आनंद झिरपतो. 'साधुसंतर चरणव पिडि नी', हे म्हणत असताना आपल्या सद्गुरूंचे पवित्र चरण आठवतात. आपल्याला त्यांनी मार्गी लावले अशी धन्यता वाटते म्हणून हा प्रयत्न आहे. या हृदयींचे त्या हृदयीं घातलें हाच रूपांतराचा अंतिम हेतू असतो, आणि तोच मनात धरला आहे.

नेहमीप्रमाणे गुरुबंधू आणि गुरुभगिनी यांनी भक्तिभरल्या अंतःकरणाने आणि सढळ हातांनी मदत केली. त्याबद्दल मौन.

सोलापूर
घटस्थापना, १२ ऑक्टोबर २००७

पद्मा कुलकर्णी

काकडारती

नारायण, नारायण, नारायण, नारायण ।।
बेळगायितु, बेळगायितु, बेळगायितु, बेळगायितु ।।
एळय्या एळु निनगेष्टु निद्रा ।।
एळु नारायण एळु लक्ष्मीरमण ।
एळु श्रीगिरिवास श्रीव्यंकटेश ।। पल्ल ।।
कासिद हालुगळु कावडियल्लि तुंबि
लेसागि हाल्मोसरु बेण्णेयनु कडेदु ।
शेषशयनने एळु समुद्रमथनव माडु
देश केंपायितु एळु हरिये ।। १।।
अरळु मल्लिगि जाजि[१] परिमळद पुष्पवनु ।
सुररु तंदिट्टारे सुजनरेल्ल ।
अरविंदलोचन श्रीगोपालकृष्ण
एळय्या एळु निनगेष्टु निद्रा ।। २ ।।
दासरेल्लरु बंदु धूळिदर्शनगोंडु
लेसागि ताळदंडिगे पिडिदु ।
आदिकेशव[२] निम्म पुण्यनामस्मरणि[३]
उदयदल्लेद्दु पाडुतिर्परु हरिये ।। ३ ।।

मराठी भावार्थ

नारायण नारायण नारायण नारायण ।।
उजाडून गेले, दाही दिशा उजळल्या, प्रकाशाची प्रभा फाकली, क्षितिज तेजाळले।।
आता ऊठ बाबा, तुला झोप तरी किती असावी ?
उठि उठि बा नारायणा, लक्ष्मीरमणा, तिरुपतिनिवासी व्यंकटेशा ।। ध्रु.।।

दूध चांगलं तापवून भक्तांनी ते कावडींतून भरलं. त्याला विरजण लावून, ते दही घुसळून, त्यातलं नवनीत काढून तुझ्यासाठी सज्ज ठेवलं आहे. शेषशयना, आता डोळे उघड आणि समुद्रमंथनाला चल कसा. हे हरी, पूर्व दिशेला लाल

रंगमाळा झळकू लागल्या. आता जाऊ नको झोपी ।। १ ।।

मोगरा, मालती[१] अशी प्रफुल्ल सुगंधी फुलं तुझ्या सेवेला आणून देवदेवता व संतसज्जन उत्तिष्ठत, जाग्रत अशी तुला विनंती करत आहेत.कमलनयना, ऊठ गोपालजी, किती बरं झोप घेतोस ? ।। २ ।।

भक्तगणांनी हजेरी लावली, त्यांची धूळभेटही घेऊन झाली. सराईतपणे टाळ व वीणा घेऊन, हे आदिकेशवा[२], तुझ्या पुण्यनामाचे[३] स्मरण करत ते प्रातःकाली सामगायन करत आहेत. हे हरी, आता उठायलाच हवं बरं का ।।३ ।।

टिपणे :-

१. जाजि – जातीपुष्पाचा एक विशिष्ट प्रकार, Jasminum grandiflorum, म्हणजे चमेली किंवा मालती. जातीपुष्पाचे खंडीभर प्रकार असून मोगरा, बटमोगरा, मदनबाण, कस्तुरी मोगरा, मोतिया मोगरा, सायली, जुई, जाई, तांदळी जुई, कुसरी, माधवी, कुंद, रानमोगरा, रेवती, वनजाई, पिवळी जुई, सोनजुई, पिवळी चमेली वगैरे अनेक तऱ्हा त्यांत येतात. जाजि म्हणजे त्यांतला Jasminum gradiflorum हा प्रकार. हा अर्थ श्रीगुरुदेव नेहमी वापरत असत त्या Rev. F. Kittel यांच्या कन्नड–इंग्लिश डिक्शनरीतून घेतला आहे. इतका तपशील देण्याचे कारण Jasmine म्हटले की जास्वंद असा अर्थ केला जातो. पण जास्वंद म्हणजे जातीपुष्प नसून जपापुष्प आहे. त्याला इंग्लिशमध्ये shoeflower म्हणतात.

२. ही भूपाळी कनकदास या संतकवींची आहे. आदिकेशव किंवा कागिनेले आदिकेशव ही त्यांची मुद्रिका आहे. कागिनेले हे गावाचे नाव व आदिकेशव हे तिथले आराध्यदैवत. प्रसिद्ध संतकवी व्यासराय हे ह्यांचे गुरू. भक्ती, वैराग्य, तत्त्वज्ञान अशा विविध विषयांवर यांनी रचना केली असून अध्यात्मपूर्णता व विचारस्वातंत्र्य ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. नामस्मरणानेच मुक्ती मिळते असा त्यांचा आग्रह आहे. त्यांचा काल इ.स. १५०८ – १६०६.

३. इ. स. १९११, १९१६, १९२४ व १९३० या पहिल्या चार नित्यनेमावल्यांतून हा पाठ विष्णुनामस्मरणि असा आहे. जुन्या लोकांच्या तोंडी अजून हा पाठ ऐकू येतो.

***

शरणु सिद्धिविनायक शरणु विद्याप्रदायक
शरणु पार्वतितनयमूरुति शरणु मूषकवाहन ।। पल्ल ।।
निटिलनेत्रन वरदपुत्रने नागभूषणप्रियने ।
कटिकरांकितकोमलांगने कनककुंडलधारने ।। १ ।।
बट्टुमुत्तिन पदकधारने बाहुहंस्तचतुष्टने ।
इट्ट तोळलि हेमकंकण पाशांकुशधारने ।। २ ।।
कुक्षिमहालंबोदरने इक्षुचापन[१] गेलिदने ।
पक्षिवाहननाद पुरंदरविठ्ठलन[२] निजदासने ।। ३ ।।

मराठी भावार्थ

हे गजानना, सिद्धिविनायका, पार्वतीपुत्रा, तू विद्या प्रदान करणारी देवता आहेस. तुझे वाहन उंदीर. तुला आम्ही शरण येतो ।। ध्रु. ।।

भालप्रदेशावर ज्ञानाचा डोळा धारण करणाऱ्या शिवाचा तू पुत्र आहेस आणि स्वतः वर देणारा आहेस. कटीवर हात ठेवलेली तुझी तनू कोमल आहे. सोन्याच्या कर्णभूषणांनी तू शोभिवंत दिसतोस. शरणु शरणु ।। १।।

टपोऱ्या मोत्यांचे पदक छातीवर रुळत आहे. तू चतुर्भुज आहेस आणि तुझ्या दंडांवर सुवर्णकंकणे लखलखत आहेत. पाश व अंकुश ही चिन्हे धारण करणाऱ्या गौरीनंदना, तुझ्यापुढे आमची मान लवते ।। २।।

तुझी अंगलट विशाल आहे. हे लंबोदरा, उसाचे धनुष्य वापरणाऱ्या मदनाला[१] तू जिंकले आहेस. गरुडवाहन श्रीविष्णूचा (पुरंदरविठ्ठलाचा)[२] तू सच्चा दास आहेस. तुझ्यासमोर आम्ही नतमस्तक होतो ।। ३ ।।

टिपणे :-

१. मदनाचे धनुष्य उसाचे असते अशी कल्पना आहे.

२. ही भूपाळी पुरंदरदास या प्रख्यात कन्नड संतकवींची आहे. ते भक्तिसंप्रदायाचे प्राणच होते. ते संगीतज्ञ असून त्यांची अगणित पदे राग-तालासहित म्हटली जातात. मानसशास्त्र, नीती, तत्त्वज्ञान व पारमार्थिक अनुभव हे विषय त्यांच्या साहित्यात उठून दिसतात. हिंदी साहित्यात जे स्थान तुलसीदासांना आहे ते स्थान पुरंदरदासांना कन्नड सारस्वतात आहे असे गुरुदेवांनी म्हटले आहे. पुरंदरविठ्ठल ही त्यांची मुद्रिका. इ.स. १४८०-१५६५ या काळात ते होऊन गेले.

***

एळु सद्गुरुनाथ । एळु करुणानिधिये ।
एळु नी उमदीश । जगदीशनय्या ।। ध्रु.।।
जगदोळगे दृश्य अवतारवनु धरिसिदि ।
सर्व धर्मद मर्म तिळिसिकोट्टि ।
वेदके निलुकद[1] ईशननु तोरिसिदि ।
गुरुदेव नी एन्ननु धन्य माडिदि ।। १ ।।
गुरुविनिंदले भक्ति गुरुविनिंदले मुक्ति ।
गुरुविनिंदले सहज परमेशप्राप्ति ।
गुरुदेव निन्नहोरतु अन्यदेवरु याके ।
गुरुविन दयवोंदिद्दरे साके ।। २ ।।
धन्य गुरुदेवने धन्य उमदीशने ।
धन्य नी सद्धर्मप्रतिपालकने ।
धन्य निन्न भक्तरु आरतिय बेळगुवरु ।
भक्ततारक गुरुवे बेगनेळय्या ।। ३ ।।

मराठी भावार्थ

सद्गुरुनाथा, करुणासागरा, उमदीशा, तू जगाचा स्वामी आहेस. सद्गुरो, आता उठा जी मायबाप ।। ध्रु.।।

या जगात प्रकट अवतार घेऊन सर्व धर्मांचे सार तूच आम्हाला समजावून दिलेस. वेदांनाही[1] न आकळणाऱ्या अशा परमेश्वराचे दर्शन करून दिलेस. हे गुरुदेवा, तू मला धन्य धन्य केले आहेस।। १ ।।

गुरुकृपेनेच भक्तीचा उदय होतो. गुरुकृपेनेच मुक्ती मिळते. गुरुप्रसाद हीच चिरसुखाची युक्ती आहे. हे सद्गुरो, तुझ्यावाचून अन्य देव हवेत तरी कशाला ? गुरूंची करुणा एकटीच पुरेशी आहे ।। २ ।।

गुरुदेवा, उमदीशा, खऱ्याखऱ्या धर्माचे पालन करणाऱ्या गुरुराजा, तू धन्य आहेस. तुला आरती ओवाळणारेही तसेच धन्य आहेत. भक्ततारक गुरुदेवा, आता उठा बरं का ।। ३ ।।

टिपण :-

१. वेद एकूण चार. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद. ढोबळमानाने आगम व निगम हेही शब्द वेदांसाठी वापरतात. परंतु हे मुळात भिन्न आहेत. निगम म्हणजे वैदिक मत आणि आगम म्हणजे पुराणे व तंत्रशास्त्रातील मते. निगमांचा संबंध मुख्यत्वे ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांच्याशी असून आगमांचा संबंध अथर्ववेदाशी आहे. आगमात, ध्यान, विधी, योग व पूजातंत्र यांचा अन्तर्भाव होतो. आगम प्रत्यक्ष शिवाने दुर्वास ऋषींना सांगितले असे म्हणतात. शैव पंथात बहुधा आगम हा शब्द प्रमाणग्रंथांना वापरला जातो. वीरशैव संतांच्या रचनांतून साहजिकपणेच हा शब्द वारंवार येतो.

या भूपाळीच्या कवीचे नाव कळले नाही.

***

एळय्या आत्मारामा । यतिमुनिजन प्रेमा ।
एळय्या घनश्यामा । एन्न पालिसै गुणधामा ।। ध्रु.।।
गुरुकरुणोदयदल्लि, बोधसूर्यनु बरलु ।
मरविन कत्तलि तेरळि, बेळगायितु मनदल्लि ।। १।।
वादतारेगळडगि, विकसित हृत्कमलागि ।
साधनपक्षिगळोदगि[१], कलकलिसुतिवे बहुवागि ।। २।।
शमदमवे निस्सीम, बिभीषण सुग्रीव नेम ।
सुमति श्रद्धा परमा, इवु बंदरु जांबुव हनुमा ।। ३।।
विवेक तव भरता, वैराग्य शत्रुघ्नता ।
सावध लक्ष्मण निरुता, पद सेवेगे बंदरु त्वरिता ।। ४ ।।
शांति सीतेयु ओलिदु, निंतिहळै कै मुगिदु ।
चिंतितार्थव[२] कोडु, महिपतीसुत[३] गोलिदु ।। ५।।

मराठी भावार्थ

आत्मारामा, ऋषिमुनींच्या श्रद्धेचा तू एकमेव विषय आहेस. आता जागा हो. उठि लवकरी घनश्यामा, उठि उठि बा. तू सद्गुणांची खाण आहेस. आमचे

पालन कर ।। ध्रु. ।।

गुरुकरुणेचा महिमा थोर आहे. तिच्यामुळे 'ज्ञानाचा उदयो जाहला, अज्ञानतिमिर पळाला' व मनाला प्रकाशाचे पंख फुटले ।। १ ।।

वादविवादरूपी तारे लुप्त झाले व अंतरंग एखाद्या तरारून उमललेल्या कमळाप्रमाणे प्रफुल्ल झाले. तांबडे फुटले की पक्ष्यांचा किलबिलाट जोमाने सुरू होतो तसे साधन[१] उत्साहाने सुरू करायला आम्ही त्यांच्याकडून शिकलो ।।२।।

बिभीषण, सुग्रीव हे अमर्याद शमदमाचे प्रतीक आहेत. जांबुवंत व हनूमान हे श्रद्धेचे व सुबुद्धीचे महान द्योतक आहेत ।। ३ ।।

भरत म्हणजे प्रत्यक्ष विवेक आणि शत्रुघ्न वैराग्याचा पुतळा. लक्ष्मण तर दक्षता व तत्परता यांची मूर्तीच. ही संतांची मांदियाळी तुझ्या पादसेवेसाठी त्वरेने हजर झाली आहे ।। ४ ।।

शांतिस्वरूप सीता हात जोडून समोर उभी आहे. यांचे मनोरथ[२] पूर्ण कर अशी महीपतिसुत[३] तुझ्या चरणी याचना करीत आहे ।। ५ ।।

टिपणे :-

१. साधनपक्षी या रूपकाचा अर्थ स्पष्ट होत नाही. पक्षी किलबिलाट करतात तर साधन मौनाने चालते. उत्साह हा मुद्दा दोन्हीकडे समान असल्याने तसा अर्थ घेतला आहे. कल किंवा कलिसु याचा अर्थ शिकणे व शिकवणे असाही आहे. एकूण या शब्दाचा सुस्पष्ट अर्थ लागला नाही. साधनाला जुळेल असा अर्थ केला आहे.

२. छापलेल्या भूपाळीतील 'संचितार्थवने' या शब्दाने मोठीच समस्या उभी केली. वाच्यार्थाने संचित म्हणजे साठवलेले. ते मला दे, म्हणजे काय ? बरं, संचिताचा पारिभाषिक अर्थ संचित कर्म असा आहे. ते देवाला मागायचे म्हणजे काय ? ते मागे लागलेलेच आहे. शिवाय इथे संचितार्थव*ने* कोडु म्हणजे संचितार्थ*च* दे असे आहे. वास्तविक परमात्मा भक्ताच्या संचित कर्माचा नाश करतो, तेव्हा निदान संचितार्थ नाहीसा कर असे तरी हवे होते. या ठिकाणी तर ते मागितले आहे. याचा संबंध लागत नाही.

ही भूपाळी इ.स. १९११, १९१६ किंवा १९२४ च्या नित्यनेमावल्यांत

नाही. इ.स. १९३० मध्ये आहे. नंतर इ.स. १९९९ पर्यंत ती दिसत नाही. १९९९ मध्ये ती आली आहे आणि तिथपासून संचितार्थवने हा पाठ चालत आला आहे. तत्पूर्वी एकदा ती १९६३ साली परमार्थमंदिरात आली असून तिथेही संचितार्थवने हाच पाठ आहे. याला अपवाद म्हणजे १९३० सालची नित्यनेमावलीची चौथी आवृत्ती. तिथे पृ. ६० वर ही भूपाळी असून उपरिनिर्दिष्ट पाठ चिंतितार्थव कुडु (कोडु) असा आहे. चिंतित म्हणजे विचाराधीन हेतू, प्रेरणा, म्हणजे मनात आहे ते. इच्छित लाभ मिळू दे असा त्याचा अर्थ. हा पाठ ग्राह्य वाटतो. प्रातःकाली भक्तजन देवाला उठवत आहेत, त्यांचे मनोरथ देवाने पूर्ण करावे हा अर्थ सुसंगत वाटतो. म्हणून संचितार्थवने कोडु याऐवजी चिंतितार्थव कोडु हा पाठ घालणे इष्ट आहे. १९३० मध्ये ही भूपाळी प्रथमच आली आहे, तिथलाच पाठ स्वीकारणे व नंतरचा अपपाठ काढून टाकणे जरूर आहे.

३. महीपतिसुत म्हणजे काखंडकीच्या महीपतींचे द्वितीय चिरंजीव. यांचे नाव कृष्णराय. लहानपणी यांना अभ्यासाची आवड नव्हती, पण वडिलांच्या आशीर्वादाने त्यांच्यात आमूलाग्र बदल झाला. त्यांच्या पांडित्यपूर्ण काव्यात साधन, भक्ती व तत्त्वज्ञानही आहे. सामान्य जनांना बोध होईल अशी अलंकारयुक्त काव्यरचना त्यांनी केली. त्यांचा काल सुमारे इ. स. १६७२–१७२९.

दुपारचे भजन - भाग १

सहज माडो माडो गुरुभजनि ।
साधुसंतर चरणव पिडि नी ।। पल्ल ।।
जय गुरु, जय गुरु, जय गुरु, जय गुरु ।
जय गुरु, जय गुरु, जय ।
गुरु जय, गुरु जय, गुरु जय, गुरु जय ।
जय जय गुरु महाराज गुरु । (२ वेळा)
जय जय परब्रह्म सद्गुरु ।
सहज माडो माडो ।।

तनु मन धनवु तन्नदल्ल ।
नेनविन बायिगे नेच्चिकिल्ल ।।
घनगुरुविन पादव पिडि नी ।
अनुमानव्यातको माडो स्मरणि ।। १ ।।
आग ईग यावाग स्थिरविल्ल ।
सागि मागि पोगुदु गळिगेल्ल ।।
भोगभाग्यद भ्रमेयनु कळे नी ।
योगियागि माडो नी मनरंजनि ।। २ ।।
जातिगोत्रनीतिगे तिळियलिल्ल ।
मातुमातिनोळगे होयितेल्ल ।।
सत्यबोध गुरुविन पादव पीडि नी ।
सत्यचिदानंदन[१] माडो स्मरणि ।। ३ ।।

मराठी भावार्थ

अहो येता-जाता, उठत बसता, कार्य करिता, गुरुभजन चालू ठेवा. साधुसंतांच्या पायांचा आश्रय घ्या ।। ध्रु. ।।

जय गुरु जय गुरु जय गुरु जय गुरु ।
जय गुरु जय गुरु जय ।
गुरु जय गुरु जय गुरु जय गुरु जय ।
जय जय गुरु महाराज गुरु (२ वेळा) ।
जय जय परब्रह्म सद्गुरु ।

जसा सहजतेने श्वास घेतोस तसे सहजपणे नाम तुझ्या जिभेवर नाचू दे.

तन, मन, धन, यांतलं काही म्हणता काही आपलं नाही. लोकभ्रमावर विश्वास धरू नको. आपल्या सद्गुरूंचे पाय धर. गुरुपुत्र आहेस. मग अजून भ्रांती कशाला ? तुझ्या मनाला नामाचा छंद लागो ।। १ ।।

हा संसार पूर्वी कधीच शाश्वत नव्हता, आताही नाही. तो क्षणभंगुर आहे. आला क्षण, गेला क्षण करीत करीत काळ उलटत जाऊन वार्धक्य येत आहे. उपभोग आणि वैभव कायम असल्याचा भ्रम सोड. योग्याप्रमाणे राहा. सदासर्वदा

नाम वाचे असो दे ।। २।।

जात–गोत रूढी किंवा रीतिरिवाज यांना सत्य सापडलेच नाही. शब्दज्ञानाने तर सगळेच वाहून जाते. जो खऱ्या ज्ञानाचा उपदेश करील अशा सद्गुरूचे चरण घट्ट धर आणि सत्यस्वरूप चिदानंदांचे[१] स्मरण करत राहा ।। ३ ।।

टिपण :–

१. सत्यचिदानंद हे कवींचे गुरू असावेत. पण हे नक्की कोण याचा पत्ता लागत नाही. चिदानंद, सत्यचिदानंद, देवचिदानंद, चिदानंद अवधूत अशी नावे पुन्हा पुन्हा येतात.

***

परमहंस प्रकाशगे मंगल ।
परंज्योति परब्रह्मगे मंगल ।। पल्ल।।
नित्यनिरंजन निर्विकारगे मंगल ।
सत्यसाधुर सहकारगे मंगल ।।
मिथ्यामाया अळिदातगे मंगल ।
मुक्ति कोडुवंथ कर्तागे मंगल ।। १।।
भेदाभेद अळिदातगे मंगल ।
भेदके निलुकद अगणितगे मंगल ।।
मेदिनियोळगे जगभरितगे मंगल ।
वादिजनर संहर्तागे मंगल ।। २।।
इंदुधर विश्वनाथगे मंगल ।
बंदु लोकापुरदल्लि निंतातगे मंगल ।।
तंदे त्रिमल्ल[१] अनंतगे मंगल ।
कंद ज्ञानदेवर दातागे मंगल ।। ३।।

मराठी भावार्थ

महामहिम स्वयंप्रकाशाचे मंगल असो. परंज्योतिस्वरूप परब्रह्माचे मंगल होवो ।। ध्रु.।।

शाश्वत, अकलंक, नित्यनिर्मल, विकाररहित तत्त्वाचं चांगभलं. साधुसंतांचा

आधारस्तंभ असणाऱ्या तत्त्वाचा जयघोष होवो. मायेच्या जंजाळातून सोडवणाऱ्याचा उदो उदो. मुक्ती प्रदान करणाऱ्या तत्त्वाला विजयश्री प्राप्त होवो ।। १ ।।

भेदबुद्धीचा विध्वंस करणाऱ्या चित्कलेची जीत. मी-तू या द्वंद्वात न फसणाऱ्या चैतन्यदीपाचा जयध्वज चमकत राहो. त्याची घनदाट दीप्ती अमर्याद आहे. पृथ्वीला ओतप्रोत व्यापणाऱ्या विश्वंभराचे सुमंगल होवो. वितंडवाद घालणाऱ्यांचा उच्छेद करणाऱ्या सर्वोत्तमाची जैत रे जैत ।। २ ।।

मस्तकावर चंद्रकला मिरवणाऱ्या शिवाची विजयपताका फडकत राहो. लोकापूर या गावी येऊन स्थायिक झालेल्या परमतत्त्वाचे मंगल होवो. सद्गुरू त्रिमलांचा[1] विजय असो. जणूकाही ज्ञानेश्वरपुत्र असणाऱ्या दात्याचा जयजयकार होवो ।। ३ ।।

टिपण :-

१. हा कवी त्रिमलांचा पुत्र किंवा शिष्य असू शकतो. त्याचे सद्गुरू लोकापूर या गावी राहात होते असे दिसते. तंदे त्रिमल (बाप त्रिमल) हे बाप रखुमादेवीवर अशा प्रकारचे वाटते.

रात्रीचे भजन

माडो परमेश्वर गुरुध्यान । बिडदिरुवदु भजन ।
नोडो नी निन्नोळु निजखून । पूर्णैक्यद ज्ञान ।। १ ।।
अपरूपद नरतनुविदु नोडो । सडगरदि पाडो ।
अपहास्यव माडदे नी कूडो। घनचिन्मय गूडो ।। २ ।।
अग्निचक्रद[1] बळियल्लि । एरडु कमलदल्लि ।
प्राज्ञा झगिझगिसुव बेळकल्लि । तिळि निन्नोळगिल्लि ।। ३ ।।
मेलिन[2] स्थानद सहस्त्रार । गुरुतत्त्वदपूर ।
पेळलळवल्लद सुखसार । शंकरपदविवर । भीमाशंकरपदविवर[3] ।। ४ ।।

मराठी भावार्थ

आत्मज्ञानी सद्गुरू म्हणजे प्रत्यक्ष परमात्मा. त्याचे ध्यान व गुणगान हा

तुझा श्वासोच्छ्वास होऊ दे. ध्यान सोडणे प्राणघातक आहे. पिंडी ते ब्रह्मांडी या सत्यवचनाचा तू स्वतःच अनुभव घे ।। १।।

तुझे भाग्य फळले आणि तुला हा नरदेह अवचित लाभला. डौलाने भजन गात राहा. टिंगल टवाळीच्या आडवाटेला जाऊ नको. चिन्मय तत्त्वाच्या आश्रयाखाली राहा ।। २।।

अग्निचक्राच्या[१] दोन पाकळ्यांच्या आसमंतात चंदेरी रस कोंदला आहे. हा चित्प्रकाश आपण स्वतःच आहोत हे जाणून घे ।। ३।।

वरच्या जागी[२] सहस्रारचक्र आहे. तेच गुरुतत्त्वाचे वसतिस्थान. शाब्दिक कवायतीने त्याचे यत्किंचित ज्ञान होत नाही पण तेच सुखसर्वस्व आहे. भीमाशंकर[३] कवी त्याची महती सांगतो ।। ४।।

टिपणे :-

१. हे टिपण विस्तृतपणे लिहिण्याचा हेतू असा की हठयोगाच्या प्रक्रियेतील अनेक संज्ञा पुढे पुन्हा पुन्हा आल्या आहेत. या एकाच टिपणाने त्या सर्वांचे स्पष्टीकरण होईल.

आपल्या शरीरात एक स्वायत्त मज्जासंस्था (autonomous nervous system) असून तीमधील ज्ञानतंतूंवर आपला ताबा चालत नाही. हृदय, यकृत, फुप्फुस अशासारख्या शेलक्या अवयवांकडे हे ज्ञानतंतू जातात. या संस्थेचे तपशिलवार कार्य पूर्णतया कळलेले नाही हे शास्त्रज्ञ कबूल करतात. ही संस्था म्हणजे काही ज्ञानतंतूंच्या ग्रंथी (ganglia) किंवा त्यांचे पुंजके अथवा जाळी (plexuses) आहेत. ही पाठीच्या कण्याच्या पुढच्या बाजूस म्हणजे पोटाच्या आतील अंगाला कमरेपासून मानेपर्यंत पसरली आहेत.ती विशिष्ट जागी असून त्यांतल्या बारीक गाठींपासून सूक्ष्म ज्ञानतंतू महत्त्वाच्या इंद्रियांकडे जातात. वैद्यकशास्त्राने सांगितलेल्या या ठिकाणांना योगशास्त्रात चक्रे अशी संज्ञा आहे. दोन्ही शास्त्रांतले यांचे वर्णन तंतोतंत जुळते. या चक्रांना योगशास्त्रात कमले म्हणतात. कारण त्यांचा आकार साधारणतः कमळासारखा असतो.

सहा चक्रे - अ) मूलाधार चक्र : आसन घालून ताठ बसल्यावर हे शरीराच्या मध्यरेषेवर व बरोबर खाली येते म्हणून याला आधारचक्र म्हणतात. याला चार दले आहेत. कमरेच्या आसपासच्या क्रियांवर याचा ताबा असतो.

आ) स्वाधिष्ठान चक्र : लिंगस्थानाच्या पातळीत पाठीच्या कण्याच्या पुढील बाजूस हे असते. यातूनही कटिप्रदेशातील इंद्रियांकडे ज्ञानतंतू जातात. त्या इंद्रियांचे कार्य याच्या तंत्राने चालते.

इ) मणिपूर किंवा नाभिकमल : हे बेंबीजवळ असून सूर्याप्रमाणे कांतिमय असते. हे सर्वात मोठे चक्र आहे. पचनासारख्या क्रियांवर याची हुकमत चालते. दले दहा.

ई) अनाहत किंवा हृत्कमल : पाठीतल्या बारा मणक्यांपैकी पाचव्या व सहाव्या मणक्यांच्या पुढच्या अंगाला असून त्याला बारा दले असतात. हृदय व फुप्फुस याच्या अंकित असतात.

उ) विशुद्ध : कंठाच्या जागी असून त्याला १६ दले असतात. मानेच्या जवळच्या थायरॉइड ग्रंथी व काही रोहिण्या व नीला याच्या संचालनाखाली असतात.

ऊ) आज्ञाचक्र किंवा अग्निचक्र : हे भृकुटिमध्यावर म्हणजे भ्रूमध्याला समांतर अशा मस्तकातील जागेवर असते. याला दोन दले असून ती ज्ञानतंतूंचे गड्डे आहेत. यातून मेंदू, डोळे वगैरेंकडे ज्ञानतंतू जातात. शरीराच्या बाह्य भागातून येणारे ज्ञानतंतू मेंदूकडे जाताना त्यांना या जकातनाक्यातून जावे लागते. इथून पुढे संदेश पाठवले जातात. या चक्रावर ताबा मिळवला तर बहुतेक शरीर-व्यापार हातात येतात. भ्रूमध्यदृष्टीला (नासाग्रदृष्टीला) हठयोगात इतके महत्त्व का दिले आहे हे यावरून कळते. नासाग्रदृष्टी म्हणजे नाकाच्या वरच्या किंवा खालच्या टोकावर दृष्टी स्थिर करणे. या क्रियेने मनाची एकाग्रता लवकर साधली जाते असे आता मानसशास्त्राने सिद्ध केले आहे. दोन डोळे व नाक यांच्यावर लक्ष ठेवून केलेल्या साधनाला त्रिदल साधन म्हणतात. ही तीन म्हणजे जणूकाही बेलाचे पानच आहे व त्या साधनाने शिवाच्या पायावर बिल्बपत्र वाहावे असे बिल्वपत्रिय धरिसबेकण्णा या पदात म्हटले आहे. Pathway to God in Kannada Literature या आपल्या ग्रंथात याचे सुबोध विवरण गुरुदेवांनी केले आहे (पृ. १९८-२००).

वास्तविक सहा चक्रे इथे संपली. पण कधीकधी डोळ्यांजवळ आणखी एक द्विदलचक्र मोजतात व मेंदू हे सहस्रारकमल किंवा सहस्रारचक्र मानून आठ चक्रे सांगतात. याचा उल्लेख, वरचे स्थान, मस्तक, ब्रह्मरंध्र, पश्चिमेची किंवा सूर्यास्ताची जागा, वरचे टोक, शेवटचे स्थान, सहस्रदल, अशा विविध शब्दांनी केला जातो. सहा ओलांडणे म्हणजेच सहा चक्रे ओलांडणे किंवा षट्चक्रभेद करून

सहस्रार चक्रापर्यंत पोचणे. ओलांडण्याची ही क्रिया खालीलप्रमाणे सांगितली जाते. मूलाधार चक्रापासून निघून डाव्या नाकपुडीतून वाहणारी नाडी म्हणजे इडा. उजव्या नाकपुडीतून वारा वाहणारी नाडी म्हणजे पिंगळा. या पाठीच्या कण्याच्या दोन्ही बाजूच्या नाड्या आहेत. त्या खाली माकडहाडापर्यंत पोचलेल्या असून त्यांच्यामार्फत इंद्रिये व मेंदू यांना संदेश पाठवले जातात. यांच्यामधील पोकळीला सुषुम्ना नाडी किंवा मध्यम मार्ग असे म्हणतात. सुषुम्ना मूलाधारापासून ब्रह्मरंध्रापर्यंत जाते. तिच्या मूलाधाराजवळील टोकाला कुंडलिनी शक्ती असते. बहुतेक लोकांमध्ये ही सुप्तच राहते. हिला अभ्यासाने जागे करावे लागते. हेच कुंडलिनीचे उत्थापन. या क्रियेला फार महत्त्वाचे स्थान आहे. कुंडलिनी सुषुम्नामार्गाने वर चढत जाऊन सहा चक्रांना जोडणाऱ्या ज्ञानतंतूंतून व चक्रांतून वर जाते म्हणजे सहा चक्रे ओलांडते व सहस्रार कमलापर्यंत पोचते. तिथे शिवाची व तिची भेट होते. म्हणजे आत्मैक्याचा अनुभव येतो. ही महानंदाची दिवाळी असते. कुंडलिनी शिवात म्हणजे परब्रह्मस्वरूपात लीन होते. इडा व पिंगळा या नाड्यांतील वायूचे स्पंदन थांबवून त्याचा सुषुम्नेत प्रवेश करवणे अभ्यासाने साध्य होते. हठयोगात ही गोष्ट प्राणजयाने साधली जाते तर राजयोगात मनोजयाने साधते. एकाग्र साधन व अव्यभिचारी भक्ती हा तिथे उपाय.

वाहणाऱ्या वायूचे स्पंदन थांबवणे याला कुंभक अशी संज्ञा आहे. या क्रियेचा उल्लेख 'आसन हाकि' या पाळण्यात आहे. सुषुम्ना नाडीतून कुंडलिनी ब्रह्मरंध्रापर्यंत पोचण्याचे पूर्वमार्ग व पश्चिममार्ग असे दोन मार्ग सांगतात. त्यांत थोडा फरक असला तरी दोन्हींचा शेवट ब्रह्मरंध्रातच होतो. पश्चिमेचा डोंगर किंवा अस्तमगिरी असे शब्द ज्योति बेळगुतदे या आरतीत पुढे आहेत. हा डोंगर म्हणजे सुषुम्नेचा शेवट, ब्रह्मरंध्र किंवा सहस्रारकमल. भक्तिमार्गात सांगितलेला मनोजय व हठयोगातला प्राणजय शेवटी एकाच अंतिम स्थितीला नेतात. भक्तिमार्ग किंवा नामस्मरणाने होणारी एकाग्रता हा सामान्य साधकाच्या दृष्टीने सोपा मार्ग. हठयोगातील शरीरदंडनाची तिथे जरूर नाही. असो.

२. याच पदावरचे टिपण क्र. १ पाहा.

३. हे पद सिंदगी संप्रदायातील भीमाशंकर (इ. स. १६६०–१७३१) या संतकवींचे आहे. सद्गुरु भीमाशंकर मठ, सिंदगी (जि. विजापूर) येथील नित्यभजनमाला

संग्रहात ते मिळते. भृंगवळ्ळी गुरुनाथ हे भीमाशंकरांचे गुरू. भीमाशंकर अतिशय विद्वान होते. माणसामाणसांत त्यांनी भेद केला नाही. योगशक्ती मिळवूनही ते सिद्धींच्या मोहापासून कटाक्षाने दूर राहिले. प्रकाशाचा अनुभव हे त्यांचे वैशिष्ट्य. भीमाशंकर, सहजानंद, दत्त, महेश, ईश, अशा विविध मुद्रिकांखाली त्यांनी रचना केली.

आरत्या

पंचप्राणवेंब[१] आरति माडिरि । पंचतत्त्ववेंब[२] बत्ति हच्चिरि ।
चंचलवृत्तियेंब घृतवन्हाकिरि । पंचकर्मेंद्रियगळ[३] दहन माडिरि ।। १ ।।
जयदेव जयदेव जयपरमहंस, गुरुपरमहंस ।
दयामाडिदय्या नी एनगे सर्वेश । जयदेव जयदेव ।। पल्ल ।।
आदर पडिसि आरु चक्र मीरिसिदि[४] ।
वेदके[५] निलुकद निजगुणरत्न तोरिसिदि ।।
आदिनाथनल्लि लक्षविडिसिदि । नादद मूल ॐ कारदोळु[६] बेरिसिदि ।।२ ।।
तंदेत्रिमल्ल[७] नी सद्गुरुनाथ । कंदगे ज्ञानद वस्तु कोट्टंथ दाता ।।
संदेह बिडिसि एनगे माडिदि प्रख्यात । छंददि भजिसुवे ना निनगे अवधूत ।।३ ।।

मराठी भावार्थ

पंचप्राणांच्या[१] पंचारतीने ओवाळा. पंचतत्त्वांची[२] वात लावा. इतस्ततः हुंदडणाऱ्या चंचल वृत्तिरूपी तुपाची आहुती द्या. पंचकर्मेंद्रियांचे[३] दहन करा।। १ ।।

जयदेवा, परमहंसा, गुरुपरमहंसा, हे सर्वेशा, तुझ्या दयेच्या झिमझिम पर्जन्यात मी भिजून गेलो आहे ।। ध्रु. ।।

लडिवाळपणे माझ्याकडून सहा चक्रे ओलांडून[४] घेतलीस (षट्चक्रभेद करून घेतलास). वेदांच्या आवाक्यात[५] न येणाऱ्या अमोलिक रत्नाची अंगप्रभा दाखवलीस. माझे लक्ष आदिनाथ शिवाच्या चरणी केंद्रित केलेस आणि नादाचे मूळरूप जो ओंकार[६] त्याच्याशी मला एकरूप केलेस ।। २ ।।

बापा त्रिमला[७], या बालकाला तू वस्तुदर्शन करून दिलेस, असा तू उदार दाता आहेस. माझ्या मनातल्या संशयपिशाचाचा नायनाट करून माझी वाहवा

करवलीस. हे अवधूता मी तुझे गौरवगीत गातो ।। ३ ।।

टिपणे :-

१. पंचप्राण – प्राण, अपान, समान, उदान व व्यान.

२. पंचतत्त्वे – पृथ्वी, अप्, तेज, वायू, आकाश.

३. पंच कर्मेंद्रिये – हात, पाय, जीभ, पायू, उपस्थ.

४. पृष्ठ १७ वरील टिपण क्रमांक १ पाहा.

५. पृ. ११ वरील टिपण क्रमांक १ पाहा.

६. ॐ हे वर्णमालेतील एक अक्षर आहेच, शिवाय ते ब्रह्माचे प्रतीक आहे मांडूक्य उपनिषद् म्हणजे ॐ चे विवरणच आहे. भगवद्गीतेत (८.१३) याला एकाक्षर ब्रह्म म्हटले आहे. सर्व वेदांची उत्पत्ती ओंकारापासून झाली आहे. सृष्टीच्या आरंभी ओंकाराखेरीज काहीच नव्हते. म्हणून ओंकार हे आख्ख्या त्रिभुवनाचे बीज म्हणजेच ब्रह्मस्वरूप आहे. उद्गीथ, प्रणम किंवा प्रणव म्हणजेच ओंकार. आपल्या परंपरेत प्रणवोपासनेला अनन्यसाधारण महत्त्व असण्याचे कारण म्हणजे ती प्रत्यक्ष ब्रह्माचीच उपासना आहे. ओंकाराचा जप करत करतच सूर्य आकाशमंडलात फिरतो असे छांदोग्य उपनिषदात वर्णन आहे (१.५.१) अनेकानेक ग्रंथांची व उपासनाप्रक्रियांची सुरवात ॐ पासून होते.

७. पृ.१६ वरील टिपण क्रमांक १ पाहा.

***

कर्पूरारति एत्ति बेळगिरे । कारुण्यामृतकर देवगे ।। प. ।।
नीलकंधर निगमागोचर[१] । भालचंद्राभरणगे ।।
बालगोलिदनु हाल सविदनु[२] । लोल श्रीगुरुरायगे ।। १ ।।
वारिजोद्भवशिरव[३] हरिदनु । मारहर[४] महादेवगे ।।
घोर दुरितव दूर माडुव । शूर षण्मुखनय्यगे[५] ।। २ ।।
शरणु जनके वरवनित्तनु । परम पार्वतियरसगे ।।
धरेयोळधिकवाद मुरशिंगर[६] । – पुरद सिद्धनाथगे[७] ।। ३ ।।

मराठी भावार्थ

आरतीचे तबक हातात घेऊन आरती ओवाळा. ज्याच्या हातातले अमृतकुंभ काठोकाठ भरून उसळत आहेत अशा देवाची आरती उजळा ।। ध्रु.।।

नीलकंठ शिव वेदांना[१] गवसलाच नाही. त्याच्या कपाळावर चंद्रकोर लखलखत आहे. बाळावर प्रसन्न होऊन, त्याने आणलेले दूध पिऊन त्याने बाळाचे लळे पुरवले[२]. अशी लीला करणाऱ्या महादेवाच्या आरतीचे संगीत गा ।। १।।

त्याने कमळातून जन्मलेल्या ब्रह्मदेवाचे एक डोके उडवले[३]. मदनाची राखरांगोळी केली.[४] त्या कैलासनाथाची आरती करा. तो पापाची खंडना करतो. तो शूर षडाननाचा[५] (कार्तिकस्वामीचा) पिता आहे. त्याला रत्नज्योतीने औक्षण करा ।। २।।

शरण आलेल्यांच्या डोक्यावर तो वरदहस्त ठेवतो. तो पार्वतीचा स्वामी आहे. टुमदार मूरशिंगर[६] गावातील सिद्धनाथाला[७] आरती ओवाळा ।। ३।।

टिपणे :-

१. पृ. ११ वरील टिपण क्रमांक १ पाहा.

२. एका लहान मुलाच्या हट्टासाठी महादेवांनी बाळाने नैवेद्यासाठी आणलेले दूध पिऊन त्याचे समाधान केले, अशी जुन्या कहाणीसंग्रहात एक कथा असल्याचे कळले.

३. वारिजोद्भव म्हणजे कमळातून जन्मलेला ब्रह्मदेव. पूर्वी याला पाच डोकी होती. पण त्याच्या हातून काही अपराध घडल्यामुळे शंकरांनी त्याचे एक डोके उडवले. तेव्हापासून तो चतुरानन म्हणून ओळखला जाऊ लागला. ब्रह्मदेवाचे डोके उडवणारे असे इथे शंकरांचे वर्णन केले आहे.

४. मार म्हणजे कामदेव किंवा मदन. मारहर म्हणजे कामदेवाला मारणारे शंकर. देवांना तारकासुराचा वध करण्यासाठी सेनापती हवा होता. शंकर व पार्वती यांचा विवाह होऊन त्यांना कार्तिकस्वामी नावाचा जो मुलगा होईल तोच फक्त तारकासुराचा वध करण्यास समर्थ ठरणार होता. शंकर गहन ध्यानात गुंतले होते. पार्वतीशी लग्न करण्यास त्यांना उद्युक्त करण्याचे कार्य देवांनी मदनावर सोपवले. पार्वतीबद्दल प्रेमभावना उत्पन्न व्हावी म्हणून मदनाने त्यांच्यावर आपला पाच फुलांचा बाण

सोडला. तपामध्ये विघ्न आल्याने शंकरांनी तिसरा डोळा उघडला व त्या अग्नीत मदनाची राख झाली.

५. सूर्यसन्मुखनय्यगे हा अपपाठ आहे. 'सूर्याच्या समोर उभा राहणाऱ्याचा पिता', याचा काही अर्थ लागत नाही. हा पाठ शूर षण्मुखनय्यगे असा पाहिजे. शूर अशा षण्मुखाचा म्हणजे कार्तिकस्वामीचा पिता किंवा शंकर. ही संपूर्ण आरती महादेवांची आहे. तदनुसार अर्थ केला पाहिजे. वरील क्र. ४ चे टिपण पाहा.

६. मूरसिंगर शब्दातील मूर (मूरु) याचा अर्थ तीन. सिंग म्हणजे शिंग किंवा टोक. याचा अर्थ दूरान्वयाने तीन टोकांचे म्हणजे त्रिकूट असा होऊ शकतो. हा अर्थ हठयोगाच्या परिभाषेला धरून झाला. पण सिंगरपूर म्हणजे शृंगारपूर या नावाचे गाव हा सरळ अर्थ आहे, तोच ग्राह्य वाटतो.

७. सिद्धनाथ हे शृंगारपूरचे ग्रामदैवत. गावाच्या नावावरून किंवा ग्रामदैवताच्या नावावरून कवी कोण असावा याचा अंदाज लागत नाही.

***

जय जय काडसिद्ध । आरति माडुवे सिद्ध ।। प. ।।
मुत्तिन आरति । बंगारद बत्ति ।
दीविगि चंद्रदीप्ति । बेळगुवे पूर्ण भक्ति ।। १ ।।
आरति माडुत । प्रेमदि हाडुत ।
स्वामी ना निन्न दूत । करुणा माडो कृपावंत ।। २ ।।
आरति मेच्चिद । तानु वरव कोडबंद ।
कृपादृष्टियिंद । तुळजागे[१] सदानंद ।। ३ ।।

मराठी भावार्थ

जय जय काडसिद्धा, मी तुझी आरती करतो ।। ध्रु. ।।

मोत्यांची आरती, त्यात सोन्याची वात, चंद्राची आल्हाददायक दीप्ती हीच कोणी दिवटी घेऊन मी दृढ भक्तीने आरती पाजळतो ।। १ ।।

प्रेमाने मोहरून जाऊन मी आरती गातो. हे स्वामी, मी तुझा दास आहे. कृपावंता, मजवरि करुणेचा पूर लोट ।। २ ।।

माझ्या आरतीने संतुष्ट होऊन तू स्वतः होऊन आलास व मला वर दिलास. तुझ्या अनुग्रहाचा शेला पांघरल्यावर या तुळजाची[१] धणी पुरली ।। ३ ।।

टिपण :-

१. तुळजा या नावावरून आरती कोणी पुरुषभक्ताने केली आहे की स्त्रीसाधिकेने केली आहे हे कळत नाही. कारण कन्नड भाषेत दोन्ही ठिकाणी तेच क्रियापद येते. पण आरतीचा कवी तुळजाप्पा असा पुरुष आहे असे कळल्यावरून मराठी रूपांतरात पुल्लिंगी क्रियापदे घातली आहेत.

***

जय जय जय जय आरति माडुवे । जय जय जय जय आरति तुंबुवे ।।
जय जय जय जय आरति बेळगुवे ।। अंगदायक स्वामिगे ।। प. ।।
सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।
हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।
सूर्यवर्णिगे सुंदररूपिगे । मंदिरदोळु कुणिदाडु देवगे ।।
चौरि चामर चक्रदोडेयगे । मुप्पिन मुनिगे[१] ओप्पुव रूपिगे ।।
सांब हरनिगे साक्षात शिवनिगे । बेळगुवे आरतिय ।। १ ।।
सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।
हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।
चंद्रवर्णिगे चिन्नरूपिगे । मंजिनोळगिरु महाहर शिवगे ।।
पंजिन बेळकिले रंजिसु मुखगे । नीलवर्णिगे । बालवेषगे ।। २ ।।
सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।
हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।
ज्योतिवर्णिगे डुलासुरूपिगे । नलिनलिदाडुव नागर हेडिगे ।।
आगमकारगे[२] अनेकरूपिगे । जगद अरसगे जन्म विनाशगे ।। ३ ।।
सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।
हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।
लिंगवर्णिगे निझंकारगे । झणा झणा बहुनाद भोरगे ।।
अंगदोळगिरु संगमेशगे । गंगाधरगे गौरीहरगे ।। ४ ।।

सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।
हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।
एन्नवर्णिगे चन्नरूपिगे । भिन्नविल्लदे पाद तोरुवगे ।
मत्ते बारद मुक्ति कोट्टगे ।। नंबिद भक्तगे तुंबितुळुकुवगे ।। ५ ।।
सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।
हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।
देशकधिकवाद वास उमदि[३] । गुरुविन पाददोळानंद शिव ।।
आतन बोधदोळु निमग्न हर । नडुमध्यदल्लि कंडेवु घन ।।
परिपरियिंदलि । परमात्मनिगे ।। ६ ।।
सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।
हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।

मराठी भावार्थ

जय जय जय जय उच्चारत मी आरती ओवाळते. जय जय जय जय मी आरती सिद्ध करते. जय जय जय जय मी ज्योत पाजळते. माझा प्रतिपाळ करणाऱ्या स्वामींची मी आरती गाते ।। ध्रु. ।।

सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।
हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।

देवाचं रूप नयनमनोहर आहे. त्यावर सूर्यमंडलाची कांती आहे. मंदिरात हे सानुलं नाचत खेळत असतं. छत्रचामर, चक्र, असं राजैश्वर्य त्याच्याकडे आहे. मुप्पिन मुनींच्या[१] त्या शोभिवंत रूपाची, सांबसदाशिवाची, साक्षात शिवाची मी आरती म्हणते ।। १ ।।

सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।
हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।

चंद्रम्याचा चंदेरी वर्ण व कनकाचा सोनेरी वर्ण त्या रूपावर झिम्मा खेळतात. हिमगिरीवर निवास करणारा हा महाहर आहे. मशालीच्या प्रकाशात त्याचे मुख झगमगते. गर्द निळ्या रंगाची छटा असणाऱ्या बालेवेषातील शिवापुढे मी आरती उजळते ।। २ ।।

सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।

हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।

थरथरणाऱ्या ज्योतीसारखे ते तेजःपुंज रूप लयबद्ध डोलत आहे. त्याच्या डोक्यावरची नागाची फणीदेखील मंदमंद हेलकावे घेत आहे. शिव हा आगमशास्त्राचा[२] कर्ता आहे. त्याचं रूप नानावर्णाकृतींनी सजलं आहे. जगाचं अधिराज्य त्याच्याकडे आहे. जन्ममरणाचा फेरा चुकवणाऱ्या त्या शिवाला मी औक्षण करते ।। ३ ।।

सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।

हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।

दिव्य कांतीचा हा शिव नादमधुर झंकार करतो. पण तो झण झण भो भो असाही शब्द काढतो. माझ्या हृदयात हा संगमेश संचरून राहिला आहे. मस्तकी देवसरिता गंगेला त्याने सांभाळले आहे. त्या गौरीच्या स्वामीसमोर मी आरती पाजळते ।। ४ ।।

सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।

हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।

या आत्मस्वरूपाची छबी लांवण्ययुक्त आहे. त्याच्याजवळ भेदभाव नाही. तो आपल्या चरणांचे भक्तांना सुभग दर्शन देतो. जिथून परतीची वाट नाही अशी स्थिरमुक्ती तो बहाल करतो. श्रद्धावंत भक्तांवर त्याची मेहेरनजर असते. त्या महादेवापुढे मी आरती प्रज्वलित करते ।। ५ ।।

सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।

हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।

उमदी[३]या पुण्यक्षेत्रात वास असणाऱ्या सद्गुरूंच्या चरणदर्शनाने साक्षात शिवाला हर्ष होतो. त्यांचा उपदेश तो शिरावर झेलतो. अहो, पण सद्गुरु व शिव यांच्यात भिन्नता आहे तरी कुठे ? त्या दोघांच्या ठिकाणी मी एकले एक परतत्त्व पाहिले. त्या परमात्म्याला मी परीपरीने आरती ओवाळते ।। ६ ।।

सांब सदाशिव सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।

हर हर हर हर सांब सदाशिव सांब सदाशिव सांब हरा ।।

टिपणे :-

१. मुप्पिन मुनी म्हणजे निंबरगी महाराजांचे गुरू. कोल्हापूरहून प्रा. आर. एन. आपटे यांनी ५.१२.१९२१ रोजी गुरुदेवांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात की निंबरगी महाराजांना इ.स. १८१४ साली मुप्पिन मुनींकडून अनुग्रह मिळाला. मुप्पिन मुनी सिद्धगिरीस राहावयास आले व त्यांनी काडप्पा मठ सुरू केला. तसेच काडसिद्ध संप्रदायाचे संस्थापक काडसिद्धेश्वर यांचे मंदिरही त्यांनी तिथे बांधले.

२. पृ. ११ वरील टिपण क्रमांक १ पाहा.

३. उमदी गुरू म्हणजे भाऊसाहेब महाराज. ही आरती शिवलिंगव्वा यांनी केलेली आहे. त्यांनी आपले गुरू भाऊसाहेब महाराज यांचा उल्लेख इथे केला आहे.

श्रीमती शिवलिंगव्वा (इ.स. १८६७-१९३०) या भाऊसाहेब महाराजांच्या, कठोर साधन करणाऱ्या शिष्या. त्या मूळच्या जतेच्या. त्यांच्या कडक वैराग्याने व आत्मानुभवाने निंबरगी संप्रदायात त्यांना मानाचे स्थान आहे. त्यांना देवाच्या बालरूपाचा अनुभव होता व ही गोष्ट त्यांच्या रचनांतून वेळोवेळी दिसून येते. संसारात अतिशय दुःख व परमार्थात अत्यंत उल्हास असे हे व्यक्तित्व होते. त्यांच्या पदांतून आरत्या, पाळणे वगैरे विषय येतात. त्यात रंगचित्रे, तेजोनिधी, सुमनसुगंध, यांच्या अनुभवांची पखरण आहे. त्यांचे काव्य मनोरम आहे.

***

ज्योति बेळगुतदे ज्योति बेळगुतदे ज्योति बेळगुतदे । झगाझग ।
ज्योति बेळगुतदे झगाझग ।। प. ।।
अस्तमगिरि[१] चन्न मस्तकदोळु[२] चलुव । वस्तु काणुतदे झगाझग ।। १ ।।
मानस तुदियलि ध्यानके[३] निलुकदे । ताने होळेयुतदे झगाझग ।। २ ।।
कंगळ मध्यदि[४] तुंग गुड्डद योगि[५] । अंग होळेयुतदे झगाझग ।।
लिंग होळेयुतदे झगाझग ।। ३ ।।

मराठी भावार्थ

ज्योत झगमग झगमग करत आहे. ती किती देदीप्यमान आहे ! सतत चमचम करत आहे, लखलखत आहे ।। ध्रु. ।।

सूर्यास्ताकडचा म्हणजे पश्चिमेचा डोंगर[१] तेजाळला आहे. मस्तकाच्या[२] ठिकाणी गात्रे फुलवणाऱ्या वस्तूचे दर्शन होत आहे ।। १ ।।

मन उन्मन झालं. आता तर्काची[३] वार्ता नाही. त्या वस्तूच्या किरणांनी स्वतःच फेर धरला आहे ।। २ ।।

डोळ्यांच्या मध्यभागी[४] (भ्रूमध्यावर) आत्मा तळपत आहे. परमात्म्याचे तेज धो धो वाहत आहे, असं तुंग गुड्डद योगी[५] म्हणतात ।। ३ ।।

टिपणे :-

१. पृ. १७ वरील टिपण क्रमांक १ पाहा.

२. तत्रैव.

३. प्रस्तावना पृ. ५ पाहा.

४. पृ. १७ वरील टिपण क्रमांक १ पाहा.

५. ही आरती मडिवाळ योगी या संतकवींची आहे. त्यांची प्रधान मुद्रिका गुरु महांत असल्याचे अलीकडील संशोधनाने दाखवले आहे. तुंग गुड्डद योगी ही त्यांचीच मुद्रिका आहे. या अर्थी ते विशेषनाम असल्याने उंच डोंगरावरचा योगी असे त्याचे भाषांतर करायचे नसते.

मडिवाळ योगी हे बिदनूर या गावचे. जन्म सुमारे इ. स. १७८०, जिवंत समाधी १८५५. लहानपणापासून जपतपाची आवड. वीरशैव संतांची शिकवण त्यांनी सामान्य लोकांपर्यंत पोचवली. सद्गुरुस्मरण व सदाचार यांवर त्यांचा भर होता. त्यांच्या लोकगीतांतून पारमार्थिक अनुभवांचे दर्शन होते.

***

नमो नमो एंबे गुरुवे कडेग्हायिसु तंदे ।। प. ।।

हर हर नमो नमो एंबे गुरुवे कडिग्हायिसु तंदे ।

सदाभरित एन्न हृदयकमलदोळु । सदाभरित एन्न हृदयकमलदोळु ।

सुधामृतवनु सुरिसुवि एंबे (अ. प.)

नमो नमो एंबे गुरुवे कडिग्हायिसु तंदे ।।

हर हर नमो नमो एंबे गुरुवे काडिग्हायिसु तंदे ।

आशे माडि बंदे निम्म अनुभवदोळु कुळिते ।

हर हर आशे माडि बंदे निम्म अनुभवदोळु कुळिते ।
मोसवागदे भासुर प्रणमदोळु । मोसवागदे भासुर प्रणमदोळु[1] ।
निराशतपदोळु निलिसिदे तंदे । निराशतपदोळु निलिसिदे तंदे ।
नमो नमो एंबे गुरुवे कडिग्हायिसु तंदे ।
हर हर नमो नमो एंबे गुरुवे कडिग्हायिसु तंदे ।। १।।
अर्थवागुवंते अनुमान बिट्टु होगुवंते ।
हर हर अर्थवागुवंते अनुमान बिट्टु होगुवंते ।
सत्यदि शिवभजनि नित्यदि माड्डवाग। सत्यदि शिवभजनि नित्यदि माड्डवाग।
व्यर्थ चिंतेगळु परिहरिसो तंदे । व्यर्थ चिंतेगळु परिहरिसो तंदे ।
नमो नमो एंबे गुरुवे कडिग्हासियु तंदे ।
हर हर नमो नमो एंबे गुरुवे कडिग्हायिसु तंदे ।। २।।
पुण्य सुकृतदिंदे निमगे एल्ल जीवगळोंदे ।
हर हर पुण्यसुकृतदिंदे निमगे एल्ल जीवगळोंदे ।
बल्विद श्रीगुरु बसवलिंगगे[2] । बल्विद श्रीगुरु बसवलिंगगे ।
मंगळ आरति बेळगुवेनंबे । मंगळ आरति बेळगुवेनंबे ।
नमो नमो एंबे गुरुवे कडिग्हायिसु तंदे ।
हर हर नमो नमो एंबे गुरुवे कडिग्हासियु तंदे ।। ३।।

मराठी भावार्थ

तुझ्या श्रीमूर्तीला नमस्ते नमस्ते प्रभो असे मी आळवतो. सद्गुरो, आमचे संसार–साकडे फेडून टाक, बापा ।। ध्रु.।।

माझ्या हृदयसिंहासनावर केव्हापासून तुझी प्राणप्रतिष्ठा झाली आहे. तुझ्या कृपामृताचा स्राव माझ्यावर होणारच.

मी आशा बाळगून आलो आहे. तूच मला अनुभवात स्थिर केलेस. तसेच मायापाशात न गुंतू देता तेजोमय ओंकाराचे[1] दर्शन करून दिलेस आणि निष्काम अशा तपश्चर्येच्या मार्गाला लावलेस ।। १।।

गुरूंचा उपदेश मनात ठसून व संशयाला ब्रह्मांडाबाहेर घालवून

अंतःकरणपूर्वक शिवाचे भजन करण्याची प्रेरणा मला दे. माझ्या चित्ताला व्यर्थ चिंतांनी व्याकूळ होऊ देऊ नको ।। २।।

अखिल विश्वावर तुझा वरदहस्त आहे. ही आमच्या पूर्वसुकृताची जोड असल्याचे फळ आहे. वैभवशाली श्रीगुरु बसवलिंगांची[२] मी मंगल आरती करतो ।। ३।।

टिपणे :–

१. पृ. २१ वरील टिपण क्रमांक ६ पाहा.

२. कवीने श्रीगुरु बसवलिंग असा आपल्या गुरूंचा नामनिर्देश केला आहे. बसवलिंग हे नाव अनेकदा येते. या कवीचे स्वतःचे नाव कळत नाही.

***

मंगलं महालिंग उमदीश । मुनिजनपोष ।
भास उपधितीत[१] सर्वेश । इंचगेरिवास । प.।।
पृथ्विमेलिन प्रेमभक्तरनु । परिपालिसुव । नित्यनित्यदि सत्य शंकरने।।
चित्तशुद्धि माडु एन्न । कर्तृ निन्न करुणविट्टु ।
मृत्युविन बाधेयनु[२] बिडिसुव सत्य सद्गुरु काडसिद्ध ।। १।।
धरणिपालिप दुरितसंहरने । त्रिपुरांतकने[३] । चरणसेवक भजकरक्षकने ।
मायावि नीने परमपावन पंचपाशकने[४]।
मोरेय होक्कर बिरुदु कायुव अरवु कोट्टु मरवु बिडिसुव ।
शरणजनर स्मरणि तारक सुंदरात्मक[५] सगुण निधिये ।।२।।
अष्टदिक्पालकर[६] ओडेयने । सृष्टिकर्ता[७] । श्रेष्ठ सद्गुरुलिंगजंगमने ।।
निष्ठेयिंदलि नंबिदवर कष्ट कडिदु कडेगे हायिसुव ।
वृष्टि अमृत सुरिदु जगदि जयजय पडेदंथ सद्गुरु ।। ३।।

मराठी भावार्थ

मुनिजनांचे पालनपोषण करणाऱ्या उमदीशा, तुझा जयजयकार होवो. असंगाशी संग नको म्हणून मिथ्या कल्पना व नसत्या उपाधी[१] यांना तू दूर ठेवले आहेस. तू सर्वांचा स्वामी आहेस. इंचगेरी क्षेत्री तुझा निवास आहे ।। ध्रु.।।

पृथ्वीवरील प्रेमळ भक्तांचे तू कल्याण करतोस. तू म्हणजे शंकरच. तूच सर्वकर्ता आहेस. आपल्या प्रसादाने माझ्या चित्तातले किल्मिष दूर कर म्हणजे माझे मन स्फटिकतुल्य निर्मलतेने फेसाळून जाईल. भक्तांची मृत्यूची बाधा[२] तू दूर करतोस. तू प्रत्यक्ष काडसिद्धच नव्हेस काय ? ।। १ ।।

हे भूपाला, तू पापाचा संहार करतोस. त्रिपुरांना[३] तूच उध्वस्त केलेस. तुझ्या चरणांची सेवा करणाऱ्या भक्तांचे रक्षण करणे हे तर तुझे व्रतच आहे. तू हरिमायेने हरिखेळ करून दाखवतोस. तू पंचेंद्रियांना काबूत ठेवतोस[४]. जे कोणी तुझ्यासमोर शरणागती पत्करतात त्यांचे ब्रीद तू सदैव राखतोस. भक्तांच्या अंतःकरणात चित्सूर्याचा उदय करून तू त्यांच्या अज्ञानांधःकाराचा लोप करतोस. तुला शरण येऊन तुझे स्मरण करणाऱ्यांना तू तारतोस. तू महात्मा[५] असून सद्गुणांचा निधी आहेस ।। २ ।।

आठ दिक्पालांचा[६] तू अधिपती आहेस. सृष्टीतील[७] हालचालींवर म्हणजे पंचमहाभूतांवर तुझे स्वामित्व असून तू श्रेष्ठ गुरुलिंगजंगमच आहेस. ज्यांची तुझ्यावर अविचल निष्ठा आहे, त्यांचे कष्ट तू हलके करतोस आणि नीच योनींतून फिरणे त्यांच्या कपाळी येऊ देत नाहीस. जगावर अमृताचे कारंजे उसळत ठेवतोस. तुझा जयघोष होवो ।। ३ ।।

टिपणे :-

१. भासउपाधितीत या शब्दांना थोडा इतिहास आहे. ही आरती भाऊसाहेब महाराजांची असल्याने इ.स. १९११ च्या नित्यनेमावलीत ती येण्याचा सुतराम संभव नव्हता. १९१६ मध्येही ती आलेली नाही. १९२४ सालच्या तिसऱ्या आवृत्तीत ती प्रथम आली. तिथे भासउपाधितीत हे शब्द नसून भ्रमरकुंताळि कांत असा पाठ आहे. १९३० व १९४५ मध्ये निघालेल्या चवथ्या व पाचव्या आवृत्त्यांतूनही हाच पाठ आहे. १९४५ मध्ये कुंतळि ऐवजी कुंतळ असा नगण्य फरक आहे. भासउपाधितीत हे शब्द १९५२ च्या सहाव्या आवृत्तीत प्रथम आले व ते आजतागायत चालू आहेत.

भ्रमरकुंतळिकांत (भुंग्याप्रमाणे काळे कुळकुळीत केस असणारे) हे विशेषण महाराजांना लावलेले गुरुदेवांना आवडत नव्हते. शारीरिक आणि त्यातूनही सौंदर्यवाचक वर्णन त्यांना रुचणे शक्य नव्हते. ते आपल्या एका विद्यार्थ्याला

म्हणाले, 'बघ बरं, काही बदल करता येतो का ? विद्यार्थ्याने भासउपाधितीत हा पाठ सुचवला व गुरुदेवांनी तो मान्य केला. भ्रमरकुंतळिकांत याऐवजी हा नवा पाठ आता निंबाळ शाखेत रूढ झाला आहे. इतरत्र नाही. कन्नूर मठातून १९८८ साली प्रसिद्ध झालेल्या परमार्थ-मार्ग-प्रदीप या संग्रहाच्या आठव्या आवृत्तीतही भ्रमरकुंतळिकांत हाच पाठ चालू आहे.

२. मृत्यूची बाधा दूर करायची म्हणजे काय ? या मृत्युलोकात मृत्यू कुणाला चुकला आहे ? पण गुरुकृपा झाली तर साधकाच्या चौऱ्यांशीच्या यात्रा चुकू शकतात. साधकाने एकाग्र अभ्यासाने योग्यतेचा उत्तुंग बिंदू गाठला की 'गुरुकृपा उषा उजळली' हा अनुभव येतो.

प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानात स्टोइक नावाचा वैराग्यावर भर देणारा पंथ आहे. मृत्यूची बाधा न होणे, मृत्यूला जिंकणे किंवा उपनिषदांच्या भाषेत मृत्यूला ओलांडून जाणे याचा त्यांनी दुसरा अर्थ केला आहे. निष्काम वृत्तीने सद्गुण अंगी आणणे आणि जगाचा नियंता जो परमेश्वर त्याच्यावर निस्सीम प्रेम करणे हा त्यांचा आदर्श आहे. अशा माणसाला मृत्यूची भीती कशी ती राहतच नाही, कारण मृत्यू नैसर्गिक आहे हे तो जाणून असतो. प्रिय व्यक्तीचा मृत्यू तो अविचल मनाने सहन करू शकतो, गडबडून जात नाही. हेच मृत्यूला जिंकणे. हे इहलोकी साधणे शक्य असते.

३. त्रिपुर म्हणजे दैत्यांसाठी मय या असुराने निर्माण केलेली तीन गावे. आकाशात सोन्याचे, अवकाशात चांदीचे व धरणीवर लोहाचे अशी ती होती. देवांच्या विनंतीवरून शंकरांनी ही तिन्ही गावे जाळून टाकली म्हणून त्यांना त्रिपुरांतक म्हणतात.

४. पंचपाशक म्हणजे पाचांवर पाश टाकणारा किंवा पाच इंद्रियांवर ताबा ठेवणारा. मग ही पाच ज्ञानेंद्रिये घ्या किंवा पाच कर्मेंद्रिये घ्या. निंबरगी महाराजांच्या एका पदात पाश टाकण्याची कल्पना आहे, असा संदर्भ एका गुरुभगिनीने सुचवला. 'केळु चातुरा' या पदात कामरूपी पक्ष्याला अनेक महात्म्यांनी कसे नामोहरम केले त्याचे वर्णन आहे. नारदाने त्याच्यावर पाश टाकला (फाशि ओगेदनो),किंवा जाळे टाकून त्याला निष्क्रिय केले. पाच इंद्रियांवर जाळे टाकून त्यांची वळवळ थांबवणे हाच अर्थ इथे आहे.

५. सुंदरात्मक या शब्दाला रूपांतरात महात्मा शब्द वापरला आहे. भ्रमरकुंतळिकांत

या शब्दाप्रमाणेच गुरुदेवांना बोचणारा महाराजांच्या वर्णनात वापरलेला आरतीमधला आणखी एक शब्द म्हणजे सुंदरात्मक. आत्मक शब्दाचा कोशातला अर्थ made up or composed of म्हणजे सुंदरतेने घडलेला असा आहे. पुन्हा तोच प्रश्न, म्हणजे महाराजांना सौंदर्यवाचक शब्द लागू करणे. गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानात सुंदरतेला स्थान नाही. त्यांचा तत्त्वज्ञानावरील पहिला ग्रंथ म्हणजे A Constructive Survey Of Upanishadic Philosophy (या आधीचा कार्लाइलवरील ग्रंथ वाङ्मयीन स्वरूपाचा आहे). त्यात ते म्हणतात, "... the beautiful does not much fall within the scope of Upanishadic thought; but the Upanishads deal nevertheless with the sublime in nature or with the sublime in the region of mind, or even in the transcendental sphere" (2003 edition, Chapter 1, Pp. 42-43). सारांश, उपनिषदांमध्ये सौंदर्यकल्पनेला (beautiful) जागा नाही. तो मान अद्‌भुताचा (sublime) आहे. सर्व क्षेत्रांतील अद्‌भुताला तिथे गौरवले आहे. हे झाले सुरवातीच्या ग्रंथाबद्दल. अखेरीस, त्यांच्या परिपक्व तत्त्वज्ञानाचा कळस ठरलेल्या The Bhagavadgita as a Philosophy of God-realisation या ग्रंथातील शेवटच्या प्रकरणात अद्‌भुत व दिव्य (divine) दोन्हींत ऐक्य आहे असे सांगून अद्‌भुताला राजसिंहासन दिले आहे. उपनिषदे व गीता असे भारदस्त आधार या मताला आहेत. ब्रह्मसूत्रातील तत् श्रुतेः (३.४.४) किंवा अपि च स्मर्यते (२.३.४५) या सूत्रांवरील भाष्यांत शंकराचार्य आपल्या मताच्या समर्थनार्थ उपनिषदे व गीता यांचा आधार देतात. त्याचप्रमाणे गुरुदेवांनीही उपनिषदे ही श्रुती व गीता ही स्मृती यांच्या आधारानेच अद्‌भुताची थोरवी सांगितली आहे. जाता जाता हे नमूद करायला हरकत नाही की सत्यं, शिवं, सुंदरम् हा वाक्यप्रयोग त्यांना पसंत नसे. सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म हा ठसठशीत निर्देश त्यांना भावत असे. उत्कट भव्य ते घ्यावे हा त्यांचा बाणा होता. सुंदरात्मक हाही शब्द बदलावा असा त्यांचा मानस होता व तसे त्यांनी बोलून दाखवले होते. पण त्यांच्या विद्यार्थ्याला ते साधले नाही व सुंदरात्मक हा खट्याळ पाठ कायम झाला.

६. अष्ट दिक्‌पाल – आठ दिशांचे आठ स्वामी म्हणजे १) पूर्वेला इंद्र, २) आग्नेयेला अग्नी, ३) दक्षिणेला यम, ४) नैऋत्येला नैऋर्ती, ५) पश्चिमेला वरुण, ६) वायव्येला वायू, ७) उत्तरेला कुबेर किंवा सोम व ७) ईशान्येला ईश.

७. सृष्टिकर्ता या शब्दाचा सृष्टी निर्माण करणारा असा वाच्यार्थ न घेता

पंचमहाभूतांवर स्वामित्व गाजवणारा असा अर्थ घेणे सयुक्तिक आहे. रुद्राप्पाने महाराजांच्या सन्मानासाठी वापरलेल्या शब्दांतील त्याच्या मनातली अत्यादराची भावना फक्त लक्षात घ्यायची.

ही आरती रुद्रप्पा हिप्परगी नावाच्या भाऊसाहेब महाराजांच्या एका शिष्याने केली आहे. आरतीतील वर नोंदलेल्या दोन अनुचित शब्दांकडे, किंबहुना रुद्रप्पांच्या काही अनिष्ट सवयींकडे दुर्लक्ष करून गुरुदेव एकदा उद्‌गारले होते, ''त्याने महाराजांची आरती केली आहे ना, मग तो उद्धरून गेला.'' गुरुदेवांची अस्सल हिऱ्याच्या पाण्यासारखी सद्‌गुरुनिष्ठा अशी बारीकसारीक गोष्टींतून डोकावते.

***

कर्पुरारतियन्नु बेळगुवेनु । जिगजिन्नि जीयगे[१] ।। प. ।।
कर्पुरारतियन्नु बेळगुवे । निर्मलांतःकरण यतिगे ।।
निर्ममत्वद मान्य मूर्तिगे । निर्गुणन निर्बयल कीर्तिगे ।। अ.प. ।।
नंबिगेयु अंबरदि बंदिहुदो । उद्धार कार्यके ।
तपवे तोळगुत जगदोळिळिदिहुदो ।।
तन्न हिरितनवन्नु अरियदे । धन्य गुरुविन महिमे सारुव ।।
चिन्मयन चिन्नाद बीरुव । देवरायन दिव्य कोळलिगे ।। १ ।।
कर्पुरवु तानुरिय सेरुतलि । अदु उरियुतुरियुत ।
उरियोळगे अळिदुळियुवंददलि ।।
गुरुविनल्लिये तानु बेरेयुव । अवर हिरितनदल्लि मेरेयुव ।।
हिरिय आनंदवनु करेयुव । भावुरायर[२] भव्य बेळकिगे ।। २ ।।

मराठी भावार्थ

जिगजिन्नीच्या स्वामींना[१] कर्पुरारती ओवाळू ।। ध्रु. ।।

सद्‌गुरू हे शुद्ध अंतःकरण असलेले यती आहेत, निर्मलत्वाची मूर्ती आहेत. ते गुणातीत असून त्यांची कीर्ती असीम आहे. त्यांच्यापुढे कर्पुरारती पाजळू.

मूर्तिमंत श्रद्धाच त्यांच्या रूपाने आकाशात विराजत आहे. जीवांचा उद्धार करण्यासाठी तपच जणू जगात उतरून तळपत आहे. आपल्या मोठेपणाची

आठवणही न ठेवता ते आपल्या सद्गुरूंच्या महिम्याचा डांगोरा पिटतात. कर्णमधुर दिव्य नाद काढणाऱ्या देवाच्या मंगल मुरलीला कर्पुरारती ओवाळू ।। १।।

कापूर ज्योतीत शिरून जळत जळत ज्योतीत विरून जातो. पण शिष्य आपल्या सद्गुरूंशी एकरूप होऊन सद्गुरूंची कीर्ती गात राहतो. त्यांच्या मोठेपणाने स्वतः तेजाळतो व महानंदाचा पाऊस पाडतो. भाऊरायांच्या[२] सोनकिरणाला कर्पुरारतीने औक्षण करू ।। २।।

टिपणे :-

१. जिगजेवणीचे स्वामी म्हणजे श्रीअंबुराव महाराज.

२. अंबुराव महाराजांनी आपले जीवन सद्गुरू भाऊसाहेब महाराज यांच्या चरणी पूर्णपणे वाहून टाकले होते. सद्गुरुवचन त्यांना वेदवाक्य होते. परमार्थाच्या कार्यात ते गुरूंच्या हातातील साधनमात्र होते, म्हणून त्यांना इथे भाऊरावांच्या हातातील मुरली असे म्हटले आहे.

या आरतीचे कवी मनोहरपंत देशपांडे (इ. स. १८९९-१९९०) हे अंबुराव महाराजांचे शिष्य. त्यांची साहित्यसेवा मोठी असून ते ३०-३५ पुस्तकांचे लेखक आहेत. ते फार व्यासंगी होते. त्यांची काव्यरचना प्रसादयुक्त आहे. मराठी, कन्नड, इंग्रजी, संस्कृत अशा भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते.

***

सदा बेळगुतदे । ज्योति । सदा बेळगुतदे ।। प.।।
सदा बेळगुतदे हृदयकमलदोळु । अको इदे इल्याद नोडु सखि ।।अ.प.।।
ताने तानु कुळितु । तन्नोळु । एनु कळेय तुंबि ।।
एनु हेळलि स्वानुभवद । खून तोरिसिद ज्ञान मूरुति ।। १।।
तन्न ताने बेरेदु । निज सुख - । दल्ले मै मरेदु ।।
अल्ल हौदु इल्ले उंटु । बल्ल जाणरिगे सोल्ल सूक्ष्मविदु ।। २।।
नित्य निरुपाधिगे[१] । हत्तदे । मेरेवुद बयलोळगे ।।
सत्तु चित्तु आनंदवागि । एत्त नोडलदु कर्तुमूरुति ।। ३।।

मराठी भावार्थ

ज्योत झगमगत आहे, सदैव ती झगमगतच आहे. हृदयमंडलामध्ये ही सदा सर्वदा झगमग करीतच असते. सखे, पाहा, ह्या इथंच तर ती आहे ।। ध्रु. ।।

निवांत बसल्यावर एक अवर्णनीय आभा रंध्रारंध्रात तुडुंब भरते. काय सांगावे, या सौभाग्याचा अनुभव देणाऱ्या ज्ञानमूर्ती सद्‌गुरूंची लीला कुठवर वर्णावी ? ।। १ ।।

आत्म्याशी एकरूप होऊन ब्रह्मानंदाने विदेहावस्था आल्यावर सद्‌वस्तू ऐलाड पैलाड सर्वत्र अनुभवाला येते. ज्ञानी लोकांनाच हे रहस्य उलगडते ।। २ ।।

निराकार अवकाशात आत्मा विलसतो. निरुपाधींना[१] दिसणाऱ्या ज्योतीला संसाराचा लेप लागत नाही. हा सच्चिदानंद आत्मा सर्वकर्ता आहे. जिथे दृष्टी टाकावी तिथे हा असतुचि आहे ।। ३ ।।

टिपण :–

निरुपाधिसिद्ध हे अंकलगी अडिवप्पस्वामी यांचे शिष्य होते. त्यांची फार माहिती मिळत नाही. त्यांनी अनेक तात्त्विक पदे रचली आहेत.

पाळणे

आसन हाकि कुळ्ळिरिसिदवनु । नासिकाग्रदृष्टि[१] निल्लिसिदवनु ।
बीसुव वायुव तुंबिसिदवनु[२]। इंथ सूसुमुत्तिन मळेगरिसिदवनु । जो जो० ।।१ ।।
आरु चक्रद मेले[३]आरूढिसिदवनु । भेरि झांगुट्टि ताळ भोऱ्याडिसिदवनु ।
बीरुव त्रिदळ[४] साधन तोरिदनु । इंथ मूरुकोटि प्रभा बेळक तोरिदनु। जो जो० ।।२।।
सहस्त्रदळद मनिय[५] पोगिसिदवनु। जीवब्रह्मानंद[६] सुखव उणिसिदनु ।
केवळ सुषुम्नमार्ग[७] तिळिसिदनु । नम्म देव चिदानंद ताने अनिसिदनु। जो जो० ।।३ ।।
देहविद्दु[८] देहविल्लधांग इरबेकु । देहद गुणगळु तिळिदिरबेकु ।
मनसिन इंद्रियगळु दूरिरबेकु । हीगे दिनदिनक अनुभव तिळिदिरबेकु । जो जो० ।।४।।
मातु इद्दु मातु इलधांगिरबेकु । मातिन मजकूर तिळिदिरबेकु ।
पातकर गेळेतन दूरिरबेकु । इंथ नीतिमार्गक्के नेटागिरबेकु ।। जो जो० ।।५ ।।

कण्णु इद्दु कण्णु इलधांगिरबेकु । कण्णिन कळेगळु तिळिदिरबेकु ।
हुण्णिवि चंद्रमन हागे उदगिरबेकु । नम्म देव चिदानंदन९ हागे इरबेकु। जो जो० ।।६।।

मराठी भावार्थ

सद्गुरूंनी मला दृढ आसनावर बसवलं. नासाग्रदृष्टी१ स्थिर केली. सूं सूं करत चालणारा श्वास कोंडून धरला.२ माझ्यावर मोत्यांचा जोरदार वर्षाव केला।। १ ।।

मला सहा चक्रांच्या वरच्या स्थानी३ आरूढ केलं. भेरी, घंटा, टाळ यांचा भो भो असा आवाज ऐकवला व त्रिदल४ साधन करून घेतलं. परमात्म्याच्या निडळी कोटी सूर्य प्रकाशतात, तसा अपरंपार तेजोनिधी दाखवला. माझे डोळे निवले ।। २ ।।

माझ्या सद्गुरूंनी मला सहस्त्र पाकळ्यांच्या कमळापाशी५ नेलं आणि जीव–शिव यांच्या ऐक्याचे६ घास भरवले. सुषुम्नामार्गाचे७ ज्ञान झाल्यामुळेच हे साधलं. आमचे गुरू चिदानंद स्वतःच परमेश्वर असल्याची खात्री झाली ।। ३।।

देह८ असला तरी देहभाव नसावा. देहाचा स्वभाव मात्र ओळखून घ्यावा. मन व इंद्रिये यांचे पाश तटातट तोडून टाकावे. दिवसानुदिवस असा अनुभव घेत राहावं ।। ४।।

बोलता येत असलं तरी वायफळ बोलू नये, उपदेशातलं गुह्य मात्र कळलं पाहिजे बरं का. हरिविमुख असतील त्यांचा संग सोडावा. धोपटमार्गाने जीवन कंठावं ।। ५।।

डोळे असले तरी डोळ्यांवर कातडं ओढावं, पण तरीसुद्धा चौफेर दृष्टी असावी. पौर्णिमेच्या पूर्णचंद्राप्रमाणे अनुभवाचा उदय व्हावा. आमच्या चिदानंद९ देवाप्रमाणं राहावं ।। ६।।

टिपणे :–

१. पृ. १७ वरील टिपण क्रमांक १ पाहा.

२ ते ७, तत्रैव.

८. इथून पुढे तीन कडवी महत्त्वाची आहेत. देहाची योग्यता जोखून तर घेतलीच पाहिजे. देहाचा व इंद्रियांचा शहाणपणाने उपयोगही करून घेणे जरूर आहे, पण

तरीही त्यापासून अलिप्त राहणे अवश्य आहे, हे तीन उदाहरणांतून मांडले आहे. थोडेसे विषयांतर पत्करून चामरस या कवीच्या एका प्रभावी वचनाचा उल्लेख करता येईल.

काय बलिदडे माये बलिवुदु ।
माये बलिदडे छाये बलिवुदु ।
काय माये छाये बलिदडे सिद्धनवनल्ल ।
काय माया छायदागिन ।
दायवनु नेरे कळेदनादडे ।
रायनातनु सिद्धरलि गोरक्ष केळेंद ।।

(हे गोरक्षा, देह बलदंड झाला की पाठोपाठ मायाही (देहाभिमान) बलिष्ठ होते आणि माया फोफावली की छाया (प्रपंच-वासना) जोपासली जाते. काया-माया-छाया यांच्या भोवऱ्यात जो सापडला तो सिद्ध होऊ शकत नाही. उलट काया-माया-छाया या त्रिकूटाला अर्धचंद्र देणाराच सिद्धांचा राजा होतो, असे प्रभुदेव म्हणतात). Pathway to God in Kannada Literature या गुरुदेवांच्या ग्रंथात पृ. ३१६-३१७ वरील तळटीपेत याची चर्चा आली आहे.

९. पृ. १५, टिपण १ पाहा.

***

एद्द घळिगि मोदलु गुरुविन नेनेसि । अरविनोळगे नामस्मरणेय हिडिसि ।
मरविन देहक्के बोधव माडिसि । हीगे दिनदिनक आत्मन कैय सेरिसि ।।जो जो० ।। १ ।।
मूरु[१] माडबेकु चित्त पालट । आरु[२] माडबेकु अवन कैवास ।।
आग तिळियोदु योगि मने आट । इदर खून तिळियबेकु गुरुविन गुरुत। जो जो० ।।२ ।।
पापद मनेयोंदु तोळेयिसिदवनु । पुण्यद मनेयोंदु तिळियिसिदवनु ।।
नाम अमृतसार उण्णिसिदवनु । नित्यनेमदोळगे निराकार तोरिदनु । जो जो० ।।३ ।।
मनसिन ओढि कडियिसिदवनु । कनसिन प्रकार एन्निसिदवनु ।
मासमासके ताने पालटादनु । नम्म गुरुविन मग गुरियागि तोरिदनु । जो जो० ।।४ ।।
वस्तु ताने आद मस्तकदल्लि[३] । मस्तक मध्यम[४] मूल कोनेयल्लि[५] ।
सत्य पूरेंबो शिवमंत्रदल्लि । अल्लि चित्त कूडितु नम्म शिवन भेट्यागि[६] । जो जो० ।।५ ।।

बाल हुट्टिद बालेय उदरल्लि । जोगुळ हाडेवु अवन हेसरल्लि ।।
भोगद गुणगळु नीगिदवल्लि। नम्म योगिय तोट्टिल तूगिरे ब्यागदलि । जो जो० ।।६ ।।
मुत्तिन मूगुति मूगिनल्लिट्टु । वस्तु बालन तोट्टिल तूगुत ।।
अनुभवकेल्लरु कूडिरेव्व । इंथ सृष्टियोळग शिवन तोट्टिल तूगुत । जो जो० ।। ७ ।।
अप्प कोट्टनु एनगे ओप्पुव मगन । तप्पगोडदे निम्म जोगुळ हाडुवेनु ।
सत्तु हुट्टिबरुव जन्म कडिदवनु । नित्य नित्य कालदल्लि निम्मने भजिसुवेनु । जो जो० ।। ८ ।।
जोगुळ हाडेवु नोडुत अवन । कंडेवीग नम्म वस्तु बालन्न ।।
मैलिगे मुडचट्टु इल्लदे हुट्यान । इंथ रामरसदिंद काम हुट्टिदनु । जो जो० ।। ९ ।।
गुरुविन दयदिंद माडिद पदवु अरविट्टु तिळिदवरिगे आदीतु वरवु ।।
अरविल्लदवरिगे मायाद मलवु[७] । इंथ कायदोळु इरुववन तिळिदु पारागु । जो जो० ।।१० ।।
जो जो नम्म गुरविन हाडि । जो जो सत्य साधुरन पाडि ।
जो जो देव सांबन नोडि । नम्म उमदि[८] गुरुविन नेनिसि कोंड्याडि । जो जो० ।। ११ ।।

मराठी भावार्थ

जाग आल्या आल्या सद्गुरूंचे स्मरण करावे. 'मना सज्जना, एकतत्त्व नाम दृढ धर', अशी त्याला आठवण द्यावी. विसरभोळ्या देहाची समजूत काढावी व सदा सर्वदा असे करीत जावे ।। १ ।।

माझ्या सद्गुरूंनी परमात्म्याला माझ्या चुळकीत आणून बसवले. तिघांचे[१] हृदयपरिवर्तन करावे. सहाजणांना[२] सद्गुरूंच्या हाती सोपवून द्यावे. मगच सद्गुरूंची लीला समजते. गुरुघरची खूण अवगत झाली पाहिजे ।।२ ।।

माझे मन पापांनी बरबटले होते. गुरूंनी ते पार निर्मळ करून घेतले व त्याला पुण्यनिवास करून टाकले. मी गटागटा अमृतप्राशन करून तृप्त झाले. माझ्याकडून अखंड नामस्मरण करून घेऊन सद्गुरूंनी मला परतत्त्वस्पर्श करून दिला ।। ३ ।।

मन हे ओढाळ गुरू असते, त्याला दावणीला बांधले. संसार हे एक स्वप्न आहे असा बोध केला. दिसामासी ते हळूहळू पटत गेले. गुरुपुत्राकडेच (बालरूपाकडे) आमचे लक्ष वेधले ।। ४ ।।

मस्तकाच्या[३] ठिकाणची वस्तू तोच झाला. मस्तक, मधला मार्ग[४] व मूलाधार[५] यामध्ये त्याने साम्राज्य थाटले. शिवमंत्रात पूर्ण सत्य भरले आहे. शिवाची भेट[६] झाल्यावर जीव त्यात समरस होऊन गेला ।। ५ ।।

ऐके गे बाइये, बालिकेला पुत्रलाभ झाला. अनंत अवकाशाच्या पाळण्यात पहुडलेल्या बाळाला पाळणा म्हणताना आमची विषयभोगाची लालसा दूर झाली. लवकर लवकर पाळणा हलवा बरं ।। ६ ।।

सख्यानो, सुढाळ मोत्यांची नथ लेऊन या बालरूपी वस्तूला झोका देत त्या राजाधिराजाचा अनुभव घेण्यासाठी सत्वर या बरं. याचि देही याचि डोळा हा पाळणा गात राहा ।। ७ ।।

माझ्या गुरूंनी मला या गोजिरवाण्या पुत्राची देणगी दिली. मी त्याचा पाळणा झुलवतच राहते. पुनरपि जननं पुनरपि मरणं हा भोग गुरूंनी संपवला. मी रोज त्यांचेच ध्यान करते ।। ८ ।।

गाताना या तान्हुल्यावर माझी नजर खिळली आहे. इथं बसल्या बसल्या मी त्याचे रूप लोचनी देखिले गे माये. नवल तर ऐका, बाळ अगदी निर्लेप अवस्थेत जन्माला आलं. रामरसाच्या अनुभूतीने हे छकुलं माझ्या ओटीत आलं ।। ९ ।।

सद्गुरूंच्या कृपाप्रसादाने हे पद स्फुरलं. मन लावून जे ग्रहण करतील त्यांना ते वरदायक होईल. इतरेजन मायेच्या मळात[७] अडकतील. हृदयस्थ परमेश्वराला जाणून संसाराला तिलांजली द्यावी ।। १० ।।

जो जो म्हणत, सद्गुरूंचा पाळणा गात गात, जो जो म्हणत, संतांचा पाळणा हलवत हलवत. देव सांबाचे दर्शन घेत घेत, आमच्या उमदीच्या[८] सद्गुरूंचे स्मरण करावे व त्यांच्या स्तुतीत रंगून जावे, आलं का लक्षात ? ।। ११ ।।

टिपणे :-

१. तिघे म्हणजे तीन गुण- सत्त्व, रज व तम. ज्याचा त्याचा स्वभाव ठरलेला आहे. यात परिवर्तन करणे म्हणजे तीनही गुणांच्या पार जाणे किंवा त्रिगुणातीत होणे.

२. सहा म्हणजे षड्विकार हा अर्थ इथे घ्यावा लागेल (सहा या आकड्याचे इतर अर्थही आहेत). काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर असे सहा विकार मोजले जातात. ते देवाच्या हाती देणे म्हणजे त्यांचे उन्नयन करणे. त्यांची तोंडे

व्यवहाराकडून परमार्थाकडे वळवणे. मुक्तेश्वरांच्या महाभारतातील एक उदाहरण पुरेसे आहे :–

काम असावा ईश्वरभजनीं । क्रोध असावा इंद्रियदमनीं ।
तीर्थप्रसाद शेष ग्रहणीं । लोभ अपार असावा ।। (सभापर्व, ३.१७).

३. पृ. १७ वरील टिपण क्रमांक १ पाहा.

४ ते ६ तत्रैव.

७. वीरशैव तत्त्वज्ञानात कर्ममळ, आणवमळ व मायामळ असे तीन मळ किंवा दोष सांगितले आहेत.

८. भाऊसाहेब महाराज.

ही आरती शिवलिंगव्वा या भाऊसाहेब महाराजांच्या शिष्येने केलेली आहे. पृ. २७ वरील टिपण ३ पाहा.

भारुडे

जय निर्गुण निराकार प्रभो – मोदलु रेवणसिद्ध अवतारनागि – रेणागिरि पर्वतदल्लि क्रीडेयन्नाडि – आ मेले काडसिद्धेश्वर अवतारनागि – अतिवेगदिंद सिद्धगिरिगे बंदु – आ सिद्धगिरिय कोळ्ळदल्लि ऐक्यनागि गुरुलिंगजंगम अवतार तोडलु – आ मेले नारायण रूप ताळि – निंबरगियल्लि अवतार तोडलु – आ मेले रघुनाथप्रियरेंबुवरु बंदु – साधु एंदु बिरुद सारलागि – संभवामि युगे युगे सगुणरूपागि – पुण्यपरमपवित्र इंचगेरिस्थानदल्लि – कुरुहु इडलागि – काडसिद्धेश्वर सगुणरूपक्के बंदु – चिम्मडस्थानदल्लि सगुणरूपक्के बंदु – युगे युगे अवतार तोडलागि – योगनिष्ठावंत – नेनिसलागि – असंख्य एष्टो भवरोग होगलागि – विश्व ब्रह्मरूप माडलागि – एष्टो व्याधि बाधे दूर माडलागि – एनादरू सगुणरूपदल्लि निर्गुण आगलागि–देवरूपक्के कुरुहु आगुव– नर करणी माडलागि नारायणरूप आगुवदु[१] ।। १ ।।

मराठी भावार्थ

निर्गुण निराकार प्रभूचा जयजयकार होवो. सर्वप्रथम त्यांनी रेवणसिद्धाचा अवतार घेतला – आणि रेणागिरीवर लीला केली– मग काडसिद्धेश्वराचा अवतार

घेतला – जलद गतीने सिद्धगिरीस आले – तिथल्या सरोवरात अवतारसमाप्ती केली व गुरुलिंगजंगमांच्या रूपाने अवतरले – त्यानंतर नारायण नावाने निंबरगीत प्रकट झाले – मागाहून रघुनाथप्रिय म्हणून आले – व साधू म्हणून डांगोरा पिटला – संभवामि युगे युगे या गीतावचनाप्रमाणे सगुण रूप घेऊन – परमपवित्र इंचगेरीच्या पुण्यभूमीवर निशाणी ठेवली – असेच मग सगुणरूपाने चिम्मड स्थानी आले – अशा रीतीने युगायुगांतून अवतार घेऊन योगनिष्ठावंत अशी पदवी घेऊन – असंख्यांचे भवरोग नष्ट केले – विश्व ब्रह्मरूप केले – कित्येकांच्या आधि-व्याधी दूर केल्या – तपश्चर्येने जीवन्मुक्ती साधून – देवरूप असल्याचे स्पष्ट करून नरदेहातच करणी करून नारायण झाले[१].

टिपण :-

१. हे भारूड आदिनाथांपासून गुरुपरंपरा सांगते. ते मुख्यतः निंबरगी संप्रदायावर आहे. ते नागप्पा नीलवाणी यांनी रचलेले आहे.

नागप्पा हे श्रीनिंबरगी महाराजांचे नातू. भाऊसाहेब महाराजांचे शिष्य. महाराजांच्या सांगण्यावरून त्यांनी हे भारूड केले. भजने रंगवणे व पोथी वाचणे यांत ते निष्णात होते. श्रोते कोणत्या प्रकारचे आहेत हे पाहून ते दासबोधातला नेमका समास शोधून काढत. महाराजांबरोबर ते गावोगांवी जात. संप्रदायातील पुष्कळ पदे त्यांनी लिहून ठेवली आहेत.

गुरुशिष्यसंवाद

शिष्यः शरणु शरणु पूर्णानंद सत्पुरुषरे नमो नमो.

गुरुः सदानंद विवेकी इद्दकिद्धांगे आशीर्वादवु.

शिष्यः तम्मा नीन्यारु, निन्न हेसरेनु ?

गुरुः जीया, हेसरिट्टु हेळलारद वस्तुवे नानु.

शिष्यः आ वस्तु याव स्वरूपदिंद इरुत्तदण्णा ?

गुरुः मनास्सिगगोचरवागिरुत्तदे जाणा.

शिष्यः यारल्लि प्राप्तवागुत्तदीग ?

गुरुः श्रेष्ठ गुरुगळल्लि प्राप्तवागुत्तदे बेग.

शिष्यः अवरु नमगे ह्यागे दोरेयुत्तारण्णा ?

गुरुः सेवा माडुवदरिंद ओलेयुत्तारे जाणा.

शिष्यः सेवा अंदरेनु नमगे तिळियुवदिल्ल.

गुरुः सेवा अंदरे एल्ल रीतियिंद गुरुविगे संतोष कोडबेकल्ल.

शिष्यः सेवा माडुव साधकनु ह्यागिरबेकु ?

गुरु : दुःखमय प्रपंचदल्लि निराशनागिरबेकु.

शिष्यः आशे इद्दरेनु माडुत्तदय्या ?

गुरुः जन्मजन्मांतरक्के एळेदोय्युत्तदे माया.

शिष्यः याऱ्यारन्नु एळेदोय्युत्त बंददीग ?

गुरुः हेण्णु, होन्नु, मण्णु मेच्चिदवरन्नेल्ल एळेदोय्युत्त बंददीग.

शिष्यः सण्णवनागि काणिसुत्ती एंथ मातु माताडुत्ती स्वच्छ ?

गुरुः नानु सण्णवनादरे गुरुविन कृपा सण्णदेनो हुच्चा ?

शिष्यः कृपा आगबेकादरे एनु माडबेकरि ?

गुरुः हगलिरुळु देवर ध्याने माडुत्तिरबेकरि.

शिष्यः (मुदुक) दोड्डवनादमेले माडुत्तेनो हुडुगा.

गुरुः आयुष्य निन्नदेनो कोडग ?

शिष्यः माडबेकेंदरू मरवु याके बरुत्तदे तम्मा ?

गुरुः पाप हेच्चु माडिद्दरिंदो हुम्मा.

शिष्यः पापवु ह्यागादरे होगुत्तदे तंदे ?

गुरुः संतर संग माडुवदरिंद ओंदे.

शिष्यः संतरु एल्लिद्दारो सगुणा ?

गुरुः जगत्तु तुंबि इद्दारो जाणा.

शिष्यः ननगे यारु काणुवदिल्लो सुज्ञानि.

गुरुः निन्न कण्णु काणुवदिल्लो अज्ञानि.

शिष्यः ई जाणतन निनगे ह्यागे बंतल्ला ?

गुरुः संसारद तोडकन्नु बिडिसिकोंडद्दरिंदल्ल.

शिष्यः संसार याऱ्यारन्नु तोडगिसिदे कुशला ?

गुरुः जन्मजन्मांतरक्के निन्नन्ने बरिसिदे मुसला.

शिष्यः निनग्याके जन्म बंददण्णा ?

गुरुः नानु जन्मक्के बंदे इल्लो जाणा.

शिष्यः नन्न कण्णिगे ह्यागे काणिसुत्तीयल्लो हुच्चा ?

गुरुः निन्न कण्णिगे ह्यागे काणिसुत्तेनो नीचा ?

शिष्यः इंथ पूर्ण ज्ञान निनगे ह्यागे बंतु ?

गुरुः अनंत जन्मवागि तपस्सु माडोणदरिंद बंतु.

शिष्यः तपस्सु अंदरेनु माडबेकु शांता ?

गुरुः ईश्वरनल्लि शरीर आहुति कोडबेकु भ्रांता.

शिष्यः अहा नानु धन्यनादेनल्ल ईग !

गुरुः धन्यनादरे सिद्धनागुत्तीयो बेग.

शिष्यः निन्न उपकार एष्टंत हेळलि गेळिया ?

गुरुः निन्न सेवा एष्टंग हेळलि गेळिया[१] ?

शिष्यः ओळ्ळे गेळेतन कूडितु कूस.

गुरुः जय जय मंगलवागलि हंस.

शिष्यः आनंदाशीर्वाद माडु गुरुवे.

गुरुः पूर्णब्रह्मानंदवागलि अरुवे.

शिष्यः ब्रह्मनागुव कील नमगे ह्यागे तिळियबेको देवा ?

गुरुः श्रीगुरुलिंगजंगम महाराजरल्लि शरणु होगबेको जीवा.

मराठी भावार्थ

शिष्यः नमो नमो जी. पूर्णानंद सत्पुरुषांना नमस्ते नमस्ते.

गुरूः तू सदैव आनंदी व विवेकी आहेस. या रूपातच तुला आशीर्वाद असो रे बाबा.

शिष्यः बाळा, तू कोण आहेस ? तुझं नाव सांग बरं.

गुरूः स्वामी, नावच देता येणार नाही अशी वस्तू मी आहे.

शिष्यः नाव राहू दे. तिचं स्वरूप काय ते सांग की.

गुरूः अरे शहाण्या, ती वस्तू मनाच्या आवाक्यात येत नाही.

शिष्यः ठीक ठीक, पण ती कुठं मिळते ते तरी कळू दे.

गुरूः ब्रह्मज्ञानी सद्गुरूंकडे ती तयारच असते.

शिष्यः पण असे सद्गुरू आम्हाला कुठं बरं भेटतील ?

गुरूः ते साधं नाही. सेवाव्रताने त्यांना प्रसन्न करावं लागतं, बरं का.

शिष्यः सेवा म्हणजे काय हे कसं बरं समजायचं ?

गुरूः सेवा याचा अर्थ हरतऱ्हांनी सद्गुरूंना संतुष्ट ठेवणं.

शिष्यः सेवा करताना साधकाने कोणता आचारधर्म पाळावा हे आम्हाला शिकव.

गुरूः या दुःखांनी पोखरलेल्या संसारात मन गुंतू द्यायचं नाही, म्हणजे झालं.

शिष्यः समजा प्रपंचात आशा राहिली तर काय परिणाम होतो ?

गुरूः ती चौऱ्यांशी लक्ष योनींतून फरफटत नेते.

शिष्यः कुणाकुणाला तिने या यातायातीत लोटलं हे सांगितलत तर फार बरं.

गुरूः कामिनी, कांचन आणि जमीनजुमला यांची आसक्ती असणारे यच्चयावत् मनुष्यप्राणी जन्मजन्मांतरांतून गोते खात खात फिरत आले आहेत.

शिष्यः दिसतोस तर बोटाएवढा आणि म्हाताऱ्याला लाजवेल असे शहाणपण शिकवतोस.

गुरूः अरे वेड्या, मी लहान असलो तरी गुरुकृपा लहान असते का ?

शिष्यः असं का, मग सांगा की गुरुकृपा कशी मिळवायची.

गुरूः बाबा रे, अहर्निश सदा परमार्थ करावा.

शिष्यः एवढंच ना, ते मी मोठा झाल्यावर करता येईल की.

गुरूः तुझं आयुष्य तुझ्या हातात आहे का रे बेट्या ?

शिष्यः अरे लहानग्या, करायचं म्हटलं तरी ते राहूनच जातं, असं का बरं व्हावं ?

गुरूः खुळ्या, पापाचा वरचष्मा झाला की असं होतं.

शिष्यः आता पाप कसं धुऊन टाकावं ते सांग बापा.

गुरूः सदा संगती सज्जनांची धरावी.

शिष्यः हे संतसज्जन कुठं बरं सापडतील ?

गुरूः जग तर संतांनी भरलं आहे की रे शहाण्या.

शिष्यः अहो ज्ञानी, संत मला कुठं दिसत नाहीत ते ?

गुरूः अरे अडाण्या, तुझ्या डोळ्यांना दिसत नाहीत त्याला काय करावं ?

शिष्यः हे शहाणपण तुला कुठून आलं बाबा ?

गुरूः सर्वसंगपरित्याग केल्यामुळं आलं.

शिष्यः अहो विद्वान, संसाराने कुणाकुणाच्या पायात बेडी अडकवली ?

गुरूः अरे तू स्वतःच तर बेडीत जखडला आहेस.

शिष्यः तुला का बरं जन्म आला ?

गुरूः अहो शहाणे, मी जन्माला आलेलोच नाही.

शिष्यः माझ्या डोळ्यांना तर धडधडीत दिसतोस की रे.

गुरूः तुझ्या डोळ्यांना काय दिसते रे खुळचटा ?

शिष्यः इतकं पूर्ण ज्ञान तुला प्राप्त झालं तरी कसं बाबा ?

गुरूः बापा रे, पूर्वजन्मापासून तपासारखी थोर सुकृते करत आलो आहे म्हणून.

शिष्यः तप कसं करायचं ते सांगा ना भाऊ.

गुरूः ईश्वराच्या प्रेमात देहाची आहुती द्यावी लागते, कळलं का ?

शिष्यः अहाहा मी आता धन्य धन्य झालो.

गुरूः धन्य झालास ना ? आता पाठोपाठ सिद्धही होशील.

शिष्यः मित्रा, तुझे उपकार किती म्हणून सांगू ?

गुरूः सख्या, तुझी सेवा किती म्हणून सांगू ?[१]

शिष्यः स्वामी, आपली जोडी तर छानच जमली.

गुरूः जय जय अखिल विश्वाचं कल्याण होवो.

शिष्यः संतुष्ट होऊन मला स्वानंदरूप प्रसादाचा आशीर्वाद द्या हो गुरुजी.

गुरूः ज्ञानी माणसा, तू आनंदसाम्राज्याचा चक्रवर्ती होवोस.

शिष्यः ब्रह्म होण्याची गुरुकिल्ली आम्हाला कशी बरं सापडावी ?

गुरूः अरे प्राण्या, गुरुलिंगजंगम महाराजांना शरण जा म्हणजे झालं.

टिपणे :–

१. या भारुडातील एक वाक्य 'निन्न सेवा एष्टंत हेळलि ?' (तुझी सेवा किती म्हणून सांगू ?) भाऊसाहेब महाराजांनी अंबुराव महाराजांना उद्देशून उच्चारले होते. इंचगेरी येथील अंबुरावांच्या समाधीवर हे शब्द कोरलेले आहेत.

***

अगलि ना इरलारे । निन्नगलि ना इरलारे ।
बगे बगे रूपव तोरिद गुरुवे । निन्नगलि ना इरलारे ।। प.।।
इम्मन गोदिय। सुम्मने बीसेनु । उम्मायदिंद महागुरुवे ।। १।।
बीसुव कल्लिगे । लेसवु बरलेंदु । आशिट्टु हर्षदि हाडेने गुरुवे ।। २।।
सत्तु सत्तु हुट्टि । मत्ते भवदोळु बंदे । गोत्तिगे हच्चिदि गुरुराया ।। ३।।
कडलोळु तेलुत्त । मडदोळु मुळुगिद्दे । हिड्देन्नकय्य बिडलिल्ल गुरुवे ।। ४।।
वम्मन हळ्ळियोळ् । नेमदि इरुतले । प्रेमदि भक्तर सलहिदि गुरुवे ।। ५ ।।

मराठी भावार्थ

गुरुदेवा, मी कध्धी कध्धी म्हणून तुम्हाला सोडून राहणार नाही. तुम्ही नव्या नवलाईची रूपे घेऊन माझ्यासमोर येता खरे, पण मी तुम्हाला सोडणारच नाही ।। ध्रु.।।

द्वैतबुद्धिरूप गहू मी मुकाट्याने दळत राहतो, अगदी जोशात दळत राहतो. मग तुम्हाला मी सोडीन कसा ? ।। १।।

साधं दळणाचं जातं, पण त्याला सुद्धा नावाजलं पाहिजे अशी आशा बाळगून खुषीत माझं गायन चालू आहे ।। २।।

जन्म–मृत्यूच्या रहाटगाडग्यात फिरून फिरून आता पुन्हा संसाराच्या खाईत येऊन पडलो. पण तुम्ही माझे भवबंधन तोडलेतच ना ? ।। ३।।

समुद्रात तरंगता तरंगता मी लाटांच्या कल्लोळात अडकलो. पण माझा हात तुम्ही सोडला नाही. मग मी तुम्हाला सोडून राहणे कसं बरं शक्य आहे ?।। ४ ।।

वम्मन नावाच्या गावात मी नेमधर्म करत राहिलो होतो तेव्हा मोठ्या ममतेने तुम्हीच माझ्यावर पाखर घातलीत. आता मी तुम्हाला सोडणे सुतराम शक्य नाही ।। ५ ।।

टिपण :-

श्रीभाऊसाहेब महाराजांचे शिष्य चडचणचे करबसप्पा आवटी यांचे हे आवडते पद. हे पद ते साभिनय म्हणत. धोतराचा सोगा पदराप्रमाणे डोक्यावर घेत. बायका दळायला बसतात तसा एक पाय पसरून जमिनीवर बसत व खुंटा धरून जात्यावर दळत असल्याचं नाटक रंगवीत.

पदाचा कवी कोण हे कळलं नाही. तो वम्मन या गावातला आहे इतकंच समजतं.

***

निंबरगी संप्रदायात कन्नड व मराठी या जुळ्या बहिणी हातात हात घालून मिरवतात. इथे त्यांतल्या एकीचे मनोगत दुसरीच्या भाषेत सांगितले आहे.